# संवाद

अन्नपूर्णा परिवाराचे त्रैमासिक

डिसेंबर २०२१




ANNAPURNA PARIWAR
Dada Purao Research and Training Institute
FOUNDER'S DAY
21st August 2021,
Economic Growth
doesn't mean
FOUNDER'S DAY
21st August 2021,
21st August 2021,
4.30 to 6.30 pm.

# अनुक्रमणिका


* संपादकीय — *सुरेश धोपेश्वरकर*

* भारताच्या जडणघडणीत पं. जवाहरलाल नेहरूंचे योगदान — *आनंद मेणसे*

* आठवणीतल्या कमलादी... — *प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार*

* भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरक पत्रकारिता — *देवेंद्र भुजबळ*

* त्रेसष्ट कोटी युवकांचा देश आणि देशाला विदीर्ण करणारा अमली पदार्थांचा हैदोस — *डॉ. अजित मगदुम*

* निरंजना — *महावीर जोंधळे*

* 'एक बाई लढू पहाते आकाशाशी भिडू पहाते' — *छाया कोरेगावकर*

* पिंडदानेश्वर — *उषा परब*

* 'ती असे पुष्प आनंदाचे,ती असे पूर्णत्व तुझे'... — *कु.वैष्णवी गणेश साबळे*

* द्रौपदा हसीमंउद्दीन शेख — *छाया कोरेगावकर*

* अन्नपूर्णा वार्तापत्र... — *अंजली दिवाण पाटील*



**संपादकीय मंडळ**

- **डॉ. मेधा पुरव-सामंत**
- **कॉ. सुरेश धोपेश्वरकर**
- **वृषाली मगदूम**
- **अंजली पाटील**
- **बाळासाहेब पिसाळ**



**पत्ता :** अन्नपूर्णा परिवार, सेक्टर १९ ई प्लॉट नं १८, कोपरी गाव, वाशी, नवी मुंबई.

**फोन :** ०२२-२७८४५६१७


**संपादकीय**

## गांधी, नेहरू, डॉ. आंबेडकर यांचा वैचारिक वारसा जतन करा!

**- सुरेश धोपेश्वरकर**

महात्मा गांधी (जन्मदिन २ ऑक्टोबर) पंडित जवाहरलाल नेहरू (जन्म दिन १४ नोव्हेंबर) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (महापरिनिर्वाण दिन ६ डिसेंबर) असे असल्यामुळे ''संवाद'' चा ऑक्टोबर, नोव्हेंबर डिसेंबरचा अंक आपण दरवर्षी या लोकोत्तर नेत्याच्या संबंधी माहिती देऊन त्याच्या शिकवणूकीस पुन्हा उजाळा देत असतो.

२० व्या शतकातील परतंत्र भारताचे स्वतंत्र भारतामधील संक्रमणासाठी नि:शस्त्र भारतीय जनतेस विचार, आचार आणि उच्चार देणारे हे तीन्ही लोकोत्तर नेते होते. कम्युनिस्ट आणि सोशोलीस्ट विचाराच्या प्रवाहाना राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीत सामावून घेत असतानाच त्याच्याशी स्पर्धा करणारे हे नेते होते.

स्वतंत्र भारताला संसदीय लोकशाहीची घटनात्मक चौकट देणारे, त्यासाठी संस्थात्मक संरचना उभारणारे असे ते पथदर्शी नेते होते.

आज त्यांनी दिलेला संघराज्याच्या संकल्पनेवर आधारलेला, केन्द्र, राज्य आणि सामायिक विषायाची सूची, त्यातील एकमेकाचे अधिकार आणि कर्तव्य सांगणारी देशाची घटना पावलोपावली केन्द्र सरकार पायदळी तुडवत आहे.

लोकशाही ही एक जीवनप्रणाली आहे. ही या नेत्याची शिकवण आहे. लोकशाही म्हणजे केवळ निवडणूक प्रक्रीया आहे हे मोदी शहा या नेत्याचे धोरण आहे आणि लोकशाहीची ही संकुचित व्याख्या हीच बरोबर आहे असा व्हाटस्‌अप यनिर्व्हसिटीच्या नमो भक्ताचा दुराग्रह आहे.

बहुसंख्याकाचे राज्य म्हणजे लोकशाही असा एक गैरसमज जाणीवपूर्वक प्रसारीत केला जात आहे. अल्पसंख्याकाविषयी तुच्छता, त्याचा मानसिक आणि प्रसंगी शारीरिक हिंसेद्वारे छळ असा सुद्धा अपसमज सातत्याने समाजमाध्यमामधून प्रसारीत केला जात आहे. यामुळे लोकशाही प्रक्रीयेत अडथळे, आणि अडचणी दिवसेंदिवस वाढत आहेत.

घटना समिती समोरील घटना स्विकृती संबंधीच्या चर्चेचा समारोप करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असा इशारा दिला होता की आपल्या विषम समाजात प्रत्येक व्यक्तीच्या मताचे मूल्य समान आहे ही नविन संकल्पना आपण मांडत आहोत आणि घटनेचा स्विकार म्हणजे या नव्या विचाराचा, आचाराचा उच्चाराचा स्विकार होय.

सध्याच्या केन्द्र सरकारची धोरणे डॉ. बाबासाहेबांनी मांडलेल्या या विचाराशी विसंगत आहेत. त्यामुळे राज्य आणि केन्द्र सरकार

याच्यातील राजकीय पेंच दिवसेदिवस वाढत आहेत, नवे तयार होत आहेत. केन्द्र सरकार राज्याच्या स्वायत्ततेवर निर्बंध आणण्याचा हट्टवादीपणा करीत आहे आणि त्यासाठी केन्द्राच्या अखत्यारीतील CBI, ED, Income Tax, BSF या सर्व यंत्रणाचा वापर करीत आहे. केन्द्र सरकार ''एक देश एक भाषा एक संस्कृती, एक धर्म, एक कायदा, एक पक्ष'' या दिशेने पाऊले उचलीत आहे.कोणत्याही जागरूक आणि विचारी नागरिकाला चिंता आणि काळजी वाटावी अशी सध्याची देशांतर्गत परिस्थिती आहे.

केन्द्र सरकारचा हटवादीपणा आणि 'हम करेसो कायदा' हे धोरण आशिया खंडात आणि विशेष करून भारतीय उपखंडात अस्थिरता निर्माण करण्याचे मनसुबे आणि डावपेच अमेरिकन राज्यकर्ते राबवत असताना राबविले जात आहे, ही अधिक धोकादायक आणि गंभीर बाब आहे.

१ सप्टेंबर २०२१ ला अफगाणिस्तानातुन अमेरिकन सैन्य माघार घेणार यांची वाच्यता आणि चर्चा गेल्या वर्षी अमेरिकन अध्यक्षीय निवडणूकीच्या प्रचारा दरम्यान सुरू झाली. विक्षिप्त ट्रम्प यांचा पराजय करून बायडेन निवडून आल्यानंतर अमेरिकन सैन्याच्या माघारीचा प्रश्न ऐरणीवर आला. १ सप्टेंबर २०२१ ही मुदत अमेरिकन अध्यक्ष ज्यो बायडेन यानी स्वत:च घालून घेतलेली होती. परंतु स्वत: घातलेली मुदत संपण्याच्या पूर्वीच म्हणजे १४/१५ ऑगस्ट २०२१ ला अमेरिकन सैन्यानं माघार घेतली आणि अफगाणिस्थानात तालिबानी राजवट प्रस्थापित झाली. अमेरिकन सैन्यानें अफगाणिस्थानात सोडून दिलेल्या आधुनिक शस्त्रासह आज तालिबानी अफगाणिस्थानात राज्य करीत आहेत, तसेच शस्त्र सज्ज राहून तेथील सामान्य स्त्री पुरुषाना धमकावत आहेत. अमेरिकेने आर्थिक निर्बंध म्हणून नव्या सरकारची अमेरिकन बँकेतील खाती गोठविली आहेत. परिणामी नव्या तालिबानी सरकारकडे अमेरिकन शस्त्र आहेत पण नागरी प्रशासन चालविण्यासाठी पैसा नाही असा विचित्र तिढा निर्माण झाला आहे.

याचा परिणाम अफगाण नागरिक भारतीय उपखंडातील पाकिस्तान, भारत, बांगलादेश, चीन इत्यादि देशात निर्वासित म्हणून येण्यामध्ये होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या सर्व देशाच्या कोरोनाग्रस्त अर्थव्यवस्था समोर नवे प्रश्न उभे राहण्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.

दुसऱ्या बाजूने अमेरिका आणि चीन या मधील शीतयुद्ध तीव्र होत जाणार आहे. त्याच्या परिणामी आशिया खंडातील विविध राष्ट्राना आपल्या लष्करी आणि राजनैतिक व्यूहरचनेमध्ये ओढण्याचा प्रयत्न अमेरिका आणि युरोपियन युनियन करीत आहे. अमेरिका आणि चीन याच्यामधील शस्त्रास्त्र स्पर्धा आणि त्यानी पुरस्कृत केलेली शस्त्रास्त्र स्पर्धा आशियाई देशामध्ये वाढणार आहे. विकासाऐवजी देशाच्या सीमाचे एकमेकापासून संरक्षण आणि त्याकरिता वित्तीय स्त्रोत वळविले जाणार आहेत.

पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी स्वतंत्र भारताच्या पुढाकाराखाली नवस्वतंत्र देशांची अलिप्ततावादी देशाची चळवळ अत्यंत दूरदृष्टी ठेऊन उभारली होती. आशिया खंडातील आणि विशेषत: भारतीय उपखंडातील फाळणीचे, सीमा निश्चीतीचे प्रश्न हे ब्रिटिश साम्राज्यवाद्याची देन आहे या ऐतिहासिक परिप्रेक्षातून त्याकडे न पहाता ती गांधी नेहरूची देन आहे अशी विकृत मांडणी सध्याचा केन्द्रातील सत्ताधारी आणि त्याच्या परिवारातील मंडळी करीत आहेत.

दोन राष्ट्रातील या समस्या आहेत आणि चर्चेने, सामापचाराने, तिसऱ्या देशाच्या हस्तक्षेपाशिवाय आपण हे प्रश्न सोडविले पाहिजेत अशा प्रगल्भ जाणिवेचा आभाव हे आपल्या परराष्ट्र धोरणाचे लक्षण बनत आहे. कारण नेहरू नितीला नकार देणे हा केन्द्र सरकारसाठी अग्रक्रमाचा मुद्दा आहे.

दोन राष्ट्रातील समस्या दोन धर्मातील समस्या आहेत. असा संकुचित, विकृत आणि अत्यंत प्रतिगामी दृष्टीकोन सध्या देशांत केन्द्र सरकारच्या समर्थक असलेल्या परिवाराकडून पावलो पावली मांडला जातो.

बांगला देशांतील अल्पसंख्य हिंदूंच्या प्रार्थना स्थळावरील हत्याच्या निषेध करताना तेथील सरकारने घेतलेल्या धर्मनिरपेक्षतेच्या भूमिकेचे समर्थन करावयाचे की नाही, या विषयी म्हणूनच व्हाटस्‌अप युर्निव्हसीटीच्या अर्धवट रावाची तारांबळ उडाली आहे.

पाकिस्तानमधील, अमेरिकेच्या डॉलरच्या सहाय्यावर चालणारे लष्कराच्या बळावर अवलंबित इम्रान खानचे सरकार, बांगला देशमधील शेख हसीनाचे सरकार आणि आता अफगाणिस्थानातील तालिबानी सरकार चालविणारे याचा धर्म इस्लाम आहे म्हणून या सर्वाशी वैर धारावयाचे काय याचे उत्तर मोदी शहा सरकारकडे नाही आणि पर्यायाने त्याचे गुणगान जाणाऱ्या परिवाराकडे नाही.

बांगला देशाची निर्मिती हीच मुळी आधुनिक राष्ट्र धर्माच्या आधारावर उभे राहू शकत नाही. हा संदेश देणारी होती. भारतीय उपखंडात धर्माच्या आधारे फूट पाडण्याची कूट निती खेळणाऱ्या ॲग्लो अमेरिकन साम्राज्यवाद्याना, हिदी महासागरात सातवे आरमार पाठविणाऱ्या अमेरिकन लष्कराला अलिप्त राष्ट्राचे नेतृत्त्व करणाऱ्या भारताने इंदिरा गांधी याच्या नेतृत्त्वाखाली दिलेला तो मुहतोड जबाब होता.

श्रीमती इंदिरा गांधी याचा खलीस्तानवादी धर्मांध फुटीर शक्तींनी जसा बळी घेतला. तसाच सोनार बांगलाचे निर्माते शेख हसीनाचे वडील मूजबूर रेहमान याचा पकिस्तान धार्जिण्या मुस्लीम कट्टर वाद्यानी बळी घेतला ही गोष्ट सातत्याने लक्षात ठेवत धर्मांध शक्तींना गल्ली पासून दिल्ली पर्यंत निष्प्रभ करणे म्हणजे गांधी नेहरू आंबेडकराचा वारसा जतन करणे होय.

या लोकोत्तर नेत्यांना अभिवादन करीत असताना त्यांच्या विचाराचा आचाराचा, उच्चाराचा प्रचार अन्नपूर्णा सभासद रहात असलेल्या प्रत्येक वस्तीमध्ये करूया.

❖❖❖

# भारताच्या जडणघडणीत पं. जवाहरलाल नेहरूंचे योगदान

■ आनंद मेणसे

**भाग - १**

पं. जवाहरलाल नेहरू यांनी भारताच्या जडणघडणीत दिलेले योगदान खूप महत्त्वाचे आहे. आजच्या काळात तर ते जनतेपुढे मांडले जाणे आवश्यक वाटते. देशापुढे मात्र ज्या समस्या आहेत त्या म. गांधी आणि पंडित नेहरू यांनी केलेल्या चुकांमुळे निर्माण झाल्या आहेत असा चुकीचा प्रचार संघटितपणे करण्यात येत आहे. म. गांधी आणि पं. नेहरू यांचा सतत द्वेष करणे आणि आपल्या अपयशाचे खापर त्यांच्या डोक्यावर फोडणे हा काही संघटनांचा रोजचा कार्यक्रम झाला आहे आणि म्हणून पं. नेहरू यांच्याविषयी बोलणे, लिहिणे आवश्यक ठरते. हे काम उचित गांभीर्याने होण्याची गरज आहे. मात्र हे काम म्हणावे तेवढे प्रभावीपणे होताना दिसत नाही. हो खेदजनक गोष्ट आहे.

पं. नेहरूंच्या योगदानाचा विचार करता तो दोन विभागात करता येतो. स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होऊन त्यांनी केलेले कार्य, केलेला त्याग आणि स्वातंत्र्योत्तर काळात देशाचे नेतृत्व करून देश प्रगतिपथावर कसा येईल यासाठी त्यानी केलेला प्रयत्न.

**स्वातंत्र्य चळवळीतील कार्य**

पं. मोतीलाल नेहरू हे प्रख्यात कायदेतज्ज्ञ तसेच ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी असत. अलाहाबाद येथील त्यांचे 'आनंद भवन' हे निवास स्थान देश–विदेशातील नेत्यांनी गजबजलेले असे. तेथे महत्त्वाचे निर्णय घेतले जात. अशा वातावरणात जवाहरलालचे बालपण गेले. पं. मोतीलाल हे आधुनिक विचारांचे आणि दूरदृष्टी असणारे असे नेते होते. त्यांनी उच्च शिक्षणासाठी जवारहलाल यांना युरोपात पाठविले. युरोपातील शिक्षणाची पूर्वतयारी त्यांनी घरीच करून घेतली. इंग्रजी भाषा चांगली अवगत झाली पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता. जवाहरलाल यांनी वडिलांच्या प्रयत्नांना प्रतिसाद दिला. इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठाच्या ट्रिनिटी या प्रथितयश महाविद्यालयात त्यांनी शिक्षण घेतले. या काळात त्यांनी प्रचंड वाचन केले, अनेक विद्वान मित्र त्यांनी या काळात जोडले. १९१० साली विज्ञान शाखेची पदवी त्यांनी संपादन केली. पुढील दोन वर्षे त्यांनी कायद्याचा अभ्यास केला आणि ते बॅरिस्टर झाले. आपल्या इंग्लंडमधील वास्तव्यात त्यांनी फ्रान्स, जर्मनी या देशांना भेट दिली. युरोपने केलेल्या प्रगतीमुळे ते भारावून गेले होते. आपल्या देशातही अशीच प्रगती झाली पाहिजे हा विचार त्यांच्या मनात खोलवर रुजला.

शिक्षण पूर्ण करून भारतात आल्यावर त्यांनी पं. मोतीलाल नेहरू यांच्या कार्यालयात काम करण्यास सुरुवात केली त्याचप्रमाणे स्वातंत्र्य चळवळीतही प्रवेश केला. बांकीपूर येथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात ते उपस्थित राहिले. ही त्याच्या राजकीय जीवनाची सुरूवात म्हणता येईल. तेथे त्यांची भेट गोपाळ कृष्ण गोखले यांच्याशी झाली. आपणावर त्यांचा प्रभाव पडला असे त्यांनी म्हटले आहे. गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वावरही गोखले यांचा प्रभाव होता.

दि. १३ एप्रिल १९१९ रोजी अमृतसर येथील जालीयनवाला बागेत सुरू असलेल्या सभेवर जनरल डायरने बेछूट गोळीबार करून शेकडो निरपराध नागरिकांना ठार मारले. या घटनेची चौकशी करून अहवाल तयार करण्याची जबाबदारी काँग्रेसने देशबंधू दास यांच्यावर सोपविली. त्यांना या कामात सहकार्य करण्यासाठी जवाहरलाल पुढे आले, त्यानंतर त्यांचा स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग वाढला, उत्तरोत्तर तो वाढत गेला.

सन १९२४ साली गांधीजी काँग्रेसचे अध्यक्ष झाले. ते अधिवेशन बेळगावात झाले होते. नेतृत्वाची सूत्रे हातात येताच त्यांनी काँग्रेसचा चेहरामोहराच बदलून टाकला. काँग्रेसने राजकीय विषयांबरोबरच सामाजिक विषयसुद्धा आपल्या विषय पत्रिकेवर घेतले पाहिजेत असा आग्रह धरून अस्पृश्यता निवारण, शिक्षण प्रसार, दारूबंदी, ग्राम सुधारणा महिलांना निर्णयप्रक्रियेत सामावून घेणे हे विषय स्वातंत्र्य चळवळीचे विषय केले. त्यामुळे जे लोक आजवर चळवळीपासून दूर होते ते चळवळीत सहभागी झाले. महिला आणि दलित चळवळीत आले. गांधीजींना मिळालेले हे मोठे यश होते. पं. नेहरू यांच्यावर गांधींजींचा प्रभाव होता आणि गांधीजींचा त्यांच्यावर विश्वास होता. त्यामुळेच चळवळीत गांधी-नेहरू यांची नावे एकत्रित घेण्यास सुरुवात झाली.

सायमन कमिशनला विरोध करण्यासाठी १९२८ सालात देशव्यापी आंदोलन झाले. या आंदोलनात गांधी नेहरू यांनी जे कार्य केले ते महत्त्वपूर्ण ठरले. 'सायमन गो बॅक' ही घोषणा देशभर दुमदुमली. याच आंदोलनात लाला लजपतराय यांच्यावर लाहोर येथे लाठीहल्ला झाला ज्यामध्ये त्यांना हौतात्म्य लाभले. सायमन कमिशनला विरोध दर्शविण्यासाठी झालेल्या चळवळीत नुकत्याच स्थापन झालेल्या (१९२५) कम्युनिस्ट पक्षाने भाग घेतला. कम्युनिस्ट कार्यकर्ते सर्व शक्तिनिशी आंदोलनात उतरले.

काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याची आता मागणी करावी तसेच स्वतंत्र भारताचे स्वरूप कसे असावे याचाही विचार करावा अशी मागणी पुढे येऊ लागली. अशी मागणी करण्यामध्ये डाव्या विचारांचे कार्यकर्ते आघाडीवर होते. स्वत: गांधीजी, पं. मोतीलालजी यांचा विचार वसाहतीच्या स्वराज्याच्या बाजूचा होता. सन १९२९ साली लाहोर येथे भरलेल्या अधिवेशनाचे अध्यक्षपद जवाहरलाल यांच्याकडे येताच त्यांनी संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मांडण्याचा विचार केवळ बोलून दाखविला नाही तर त्याचा आग्रही धरला. त्यांच्या आग्रही भूमिकेमुळे जवाहरलाल यांचे म्हणणे नेते मंडळीला मान्य करावे लागले. ३१ डिसेंबर १९२९ रोजी हा ठराव मांडण्यात येऊन त्यास संमती देण्यात आली. जवाहरलाल यांनी अधिवेशनात सहभागी झालेल्या सर्वांना स्वातंत्र्याची शपथ दिली आणि येणारा २६ जानेवारी स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करण्यात यावा, असा निर्णय घेण्यात आला. लाहोरचे अधिवेशन हे अनेक अर्थाने महत्त्वाचे मानले जाते. याच अधिवेशनात लोकशाही, धर्मनिरपेक्षता, समाजवाद ही तत्त्वप्रणाली आपण स्वीकारण्याचे काँग्रेसने जाहीर केले. ही मोठी क्रांतिकारक घटना होती. चळवळीत असे पुरोगामी वळण देण्याचे काम जवाहरलाल यांनी केले. यामुळे राष्ट्रीय चळवळीची व्याप्ती फार मोठ्या प्रमाणावर वाढली. १९३० साली चळवळ किती व्यापक झाली याची प्रचीती पुढील वर्षी झालेल्या मिठाचा सत्याग्रहात आली. मिठाच्या सत्याग्रहात जवाहरलाल यांना तुरुंगवास सोसावा लागला.

सायमन कमिशनला विरोध करण्यासाठी जे आंदोलन देशभरात झाले त्याचा धसका ब्रिटिशांनी घेतला. आंदोलन रोखता यावेयासाठी त्यांनी 'पब्लिक सेफ्टी बिल' आणि 'ट्रेड डिस्प्युट बिल अशी दोन विधेयके ८ एप्रिल १९२९ मध्ये मंजूर करून घेतली. पण ती मंजूर होण्याआधीच सरकारने २० मार्च १९२९ रोजी देशभरातील कम्युनिस्टांची धरपकड केली. कामगार चळवळी उभारून राणी सरकार उलथून टाकण्याचा प्रयत्न कम्युनिस्ट करीत आहेत असा आरोप त्यांनी केला. हा खटला त्यांनी उत्तर प्रदेशातील मीरत या गावात चालविला. म्हणून तो मीरत कराचा खटला म्हणून ओळखला जातो. कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना कटात गोवण्यात येत आहे हे पाहून म. गांधी त्यांच्या बचावासाठी पुढे सरसावले. त्यांनी बंदिवानांसाठी बचाव समिती स्थापन केली. निधी संकलन करणे आणि न्यायालयीन कामकाज पाहण्याची जबाबदारी त्यांनी पं. जवाहरलाल नेहरू यांच्यावर सोपविली जी त्यांनी यशस्वीपणे पार पाडली. यावरून म. गांधी आणि पं. जवाहरलाल नेहरू कम्युनिस्ट चळवळीकडे सहानुभूतीने पाहात होते, हे स्पष्ट होते.

३१ ऑक्टोबर १९२० रोजी ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस ही राष्ट्रीय स्तरावरील कामगार संघटना स्थापन झाली. लाला लजपत राय हे पहिले अध्यक्ष. ते अधिवेशन मुंबईत झाले. स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेली आणि स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झालेली ही कामगार संघटना या कामगार संघटनेचे अध्यक्षपद पं. जवाहरलाल यांनी स्वीकारले आणि त्या माध्यमातून कामगार चळवळीतही त्यांनी भाग घेतला.

पं. नेहरू यांच्यावर रशियन राज्य क्रांतीचा प्रभाव पडला होता. सामान्य कामगार, शेतकरी, सत्ताबदल घडवू शकतात हे पाहून त्याना समाधान तर वाटले होतेच, भारतातही असा बदल होऊ शकेल काय हा मुद्दा त्यांच्या मनात घोळत होता. रशियातील समाज आणि भारतीय समाज यात जो फरक होता त्याचे उचित भान त्यांना होते. म्हणूनच तर त्यांनी मं. गांधींचे नेतृत्त्व व मार्ग स्विकारला होता. त्यांनी साम्राज्यवादाला आणि हुकूमशाहीला विरोध केला. जेव्हा जनरल फ्रँकोने स्पेनमध्ये हुकूमशाही राजवट प्रस्थापित करीत लोकशाही नष्ट केली तेव्हा तेथे जी लोक चळवळ सुरू झाली त्या लोक चळवळीला त्यांनी पाठिंबा दिला. भारतात सुरू असलेल्या स्वातंत्र्य चळवळीला आणि त्याचबरोबर स्वतंत्र भारताला जातीयवादी शक्तींपासून धोका असल्याचे त्यांनी जाणले होते आणि म्हणूनच त्यांनी सर्वच जातीयवादी शक्तींचा मुकाबला केला. जातीय दंगल रोखण्यासाठी ते धैर्याने दंगलीत शिरत आणि दंगलखोरांचे हात रोखून धरत. यावरून याची कल्पना यावी.

स्वातंत्र्य चळवळीत नेहरू म्हणजे समाजवाद असे एक समीकरण तयार झाले होते. त्यामुळे त्यांना पाठिंबा देणारे जसे होते तसेच त्यांच्या समाजवादी, लोकशाहीवादी आणि धर्मनिरपेक्ष भूमिकेला विरोध करणारेही पुढे आले. पं. नेहरूंचे कार्य आणि त्यांना मिळालेले जनतेचे पाठबळ यामुळे विरोधकांची डाळ शिजली नाही. त्यामुळे १९३८ साली नियोजन मंडळ स्थापन करण्यात त्यांना यश आले.

त्या मंडळाच्या नेतृत्वाची जबाबदारी त्यांनी सुभाषचंद्र बोस यांच्यावर सोपविली. थोर शास्त्रज्ञ मेघनाद साहा हे नियोजन मंडळाचे सदस्य होते. ते पूर्णपणे डाव्या विचारांचे होते. पं. नेहरूंची ही प्रगतिशील विचारसरणी उत्तरोत्तर विकसित झालेली १९४२ साली सुरू झालेल्या ''चले जाव'' आंदोलनाची घोषणा करताना जो ठराव मांडण्यात आला. त्या ठरावामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, स्वतंत्र भारतात शेतात व कारखान्यात राबणाऱ्यांची सार्वभौम सत्ता असेल. अशा आशयाचा ठराव होऊ शकला तो कवळ पं. नेहरू यांच्यामुळेच. भारताच्या स्वातंत्र्य लढ्याला पुरोगामी वळण देण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केलेच. शिवाय स्वातंत्र्य चळवळीत विकसित झालेला आशय आणि तत्त्वज्ञान स्वतंत्र भारताच्या राज्य घटनेत कसे अंतर्भूत करता येईल यासाठी प्रयत्न केले.

**भाग - २**

देशाला जे स्वातंत्र्य मिळाले ते देशाचे विभाजन होऊन. भारत आणि पाकिस्तान अशी दोन राष्ट्रे निर्माण झाली. तसेच ब्रिटिश राजवटीनंतर आमची संस्थाने आम्हाला परत मिळाली पाहिजेत. आम्ही स्वतंत्र राजे आहोत अशी भूमिका घेत कांही संस्थानिकांनी बंडाचा पवित्रा घेतला. त्यातील काहींना दटावून, काहींना समजून सांगून तर हैद्राबाद संस्थानांवर लष्करी कारवाई करून ती भारतात विलीन करून घ्यावी लागली.

जम्मू काश्मीरच्या महाराजा हरिसिंग सुरुवातीस विलीनीकरणास तयार नव्हता. वेगळे राष्ट्र निर्माण करण्याचा त्याचा प्रयत्न होता. पं. नेहरू आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी जम्मू-काश्मीरला भारतात विलीन करण्यात यश मिळविले. याच काळात भारत-पाक सीमेवरील भागात भीषण जातीय दंगली झाल्या. या दंगली शमविणे आणि शांतता प्रस्थपित करणे आवश्यक होते. हे काम खूप कठीण होते. कारण पुरेसे शस्त्रबळ आपणाकडे नव्हते. अर्थबळ नव्हते. पं. नेहरूंनी जातीय दंगली थांबविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली. दंगलखोरांना नेस्तनाबूत केले. एका बाजूने हे कार्य सुरू असतानाच ३० जानेवारी १९४८ रोजी राष्ट्रपिता म. गांधी यांचा खून करण्यात आला. सारा देश शोकसागरात बुडाला. त्या काळात देशातील वातावरण स्फोटक झाले होते. परिस्थिती गंभीर होती. अशा काळात देशाच्या नेतृत्वाची सूत्रे पंडित नेहरूंकडे आली. आव्हानांचा मोठा डोंगर त्यांच्यामुळे उभा होता. त्यांनी आव्हाने स्वीकारली. पेलली आणि त्यांच्यावर मात केली. यातच त्यांचे मोठेपण आहे.

स्वातंत्र्य मिळाले त्या वेळी भारतात उद्योगधंदे फारसे नव्हते. कापड निर्मिती उद्योग होता तो मुंबई, सुरत, महाराष्ट्र, कोलकाता अशा मोठ्या शहरापुरता होता. स्वतंत्र भारतातील तरुणांच्या हाताला काम द्यायचे तर उद्योग सुरू होणे आवश्यक होते. उद्योगासाठी लागते ती वीज निर्माण करणे गरजेचे होते. कोळसा आणि लोह खनिजाचे साठे आपणाकडे होते पण खाण उद्योग मात्र सक्षम नव्हता. अशी एक की दोन अनेक आव्हाने उभी होती. ज्यांच्यावर मात करणे गरजेचे होते.

आपणाकडे उच्च शिक्षणाचा प्रभाव होता. श्रीमंत पालक आपल्या मुलांना मुंबई, कोलकाता, चेन्नई, पुणे अशा ठिकाणी पाठवत. काही मंडळी मुलांना विदेशी पाठवत. प्रश्न हा होता की सामान्य घरातील हुशार आणि होतकरू विद्यार्थ्यांचा पं. नेहरूंच्या डोळ्यापुढे तो विद्यार्थी होता. त्याच्यासाठी विद्यापीठे सुरू होणे आवश्यक होते.

देशात गुणवत्तेला कमतरता नव्हती. पण पायाभूत सुविधांचा अभाव होता. संशोधन संस्था सुरू करून शास्त्रज्ञांची निर्मिती करण्याची खूप गरज होती. देशाचा मुख्य व्यवसाय शेती होता पण ती होती पारंपरिक पद्धतीने केली जायची. पावसावर अवलंबून असणारी ती शेती. यावर उपाय म्हणून धरणे बांधणे आवश्यक होते. भारतासारखा खंडप्राय देश जोडला जायचा असेल तर रेल्वेचे जाळे विणणे आवश्यक होते. रस्त्यांची बांधणी करणे गरजेचे होते. प्रश्न होता तो हे करायचे कसे हा?

पं. नेहरूंनी या प्रश्नांचा सखोल अभ्यास केला आणि काही निर्णय त्यांनी घेतले. आपल्या सहकाऱ्यांचा विश्वास संपादन केला पं. नेहरूंनी मान्यता घेऊनच त्यांनी अंमलबजावणी केली. त्या काळात अनेक विदेशी कंपन्या भारतात गुंतवणूक करण्यास उत्सुक होत्या. त्यांना भारतात येऊ दिले नाही. इतर देशांची मदत घेणे गरजेचे होते.

अशा वेळी त्यांनी भांडवलदारी देशांपेक्षा समाजवादी देशांची मदत घेण्याचा निर्णय घेतला. रशियांच्या मदतीने त्यांनी भिलाई येथे पोलाद निर्मितीचा उद्योग उभारला. तेथे निर्माण झालेले पोलाद देशी उद्योगांना चालना देणारे ठरले. सुरुवातीच्या काळात रशियाने भारताला खूप मदत केली आहे. विशेषत: संशोधन संस्थांनी उभारणी करताना रशियन शास्त्रज्ञांची झालेली मदत विसरता येणार नाही. कृषी क्षेत्राला चालना देण्यासाठी धरणे बांधतानाही रशियन तंत्रज्ञाची मदत भारताला झाली आहे. पं. नेहरुंनी रशियातील सामुदायिक शेतीचा प्रयोग पाहिला होता. त्याचा त्यांनी अभ्यासही केला होता. तसा प्रयोग भारतातही व्हावा अशी त्यांची इच्छा होती. पण त्यांच्या अनेक सहकाऱ्यांची मात्र तशी इच्छा नव्हती. त्यामुळे ते कृषी क्षेत्रात सामुदायिक शेतीचा प्रयोग करू शकले नाहीत.

पं. नेहरू यांनी जे आर्थिक धोरण स्वीकारले ते खूप विचारपूर्वक जरी ते समाजवादाचे समर्थक होते आणि त्यांना रशियात चाललेल्या प्रयोगांचे आकर्षण होते तरी त्यांनी त्या प्रयोगाचे अंधानुकरण करणे टाळले. त्यांनी आपला वेगळा मार्ग अनुसरला जो पुढे नेहरूवादी अर्थशास्त्र या नावाने ओळखला गेला. या अर्थ रचनेमध्ये सार्वजनिक क्षेत्राच्या बळकटीकरणाला महत्त्व आहे. त्यानुसार त्यांनी सार्वजनिक क्षेत्रात उद्योगांची उभारणी केली. यामध्ये, भारतीय रेल्वे, ऑइल

ॲण्ड नॅचरल गॅस कंपनी, खाण उद्योग, राज्यांची परिवहन मंडळे अशा क्षेत्रांचा समावेश करता येईल. बँका, विमा कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण व्हावे यासाठी देशात आंदोलने सुरू होती. पं. नेहरू त्याबाबत अनुकूल होते. पण त्यांच्या हयातील ते काम पूर्णत्वास गेले नाही मात्र त्यांची कन्या इंदिरा गांधी यांनी ते पूर्णत्वास नेले. भारताची प्रगती व्हायची असेल तर सार्वजनिक क्षेत्र बळकट असावयास हवे हा. 'नेहरू' विचार, सार्वजनिक क्षेत्राबरोबरच नेहरूंनी सहकार क्षेत्राचे महत्त्व ओळखले होते. सहकारातून समृद्धीकडे जाता येते यावर त्यांचा विश्वास होता. सहकार क्षेत्राला प्राधन्य देण्याचा त्यांचा प्रयत्न राहिला. त्यांचे निकटचे आणि विश्वासू सहकारी असलेले यशवंतराव चव्हाण यांनी सहकार क्षेत्राची उभारणी महाराष्ट्रात केली. त्यापाठोपाठ गुजरात, केरळ या राज्यांनी सहकाराचा आधारे प्रगती साधली. खासगी क्षेत्र असावे पण इतके असावे की त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होऊ नये. या अर्थविचार म्हणजे 'नेहरूवादी' अर्थविचार या पद्धतीमुळेच आजवर देश प्रगती करू शकला.

पण आज मात्र नेमके याविरोधात पावले उचलली जात आहेत. खासगी क्षेत्राला प्राधान्य देत सार्वजनिक क्षेत्र मोडून काढण्यात येत आहे. सहकार क्षेत्राची मोडतोड करण्याचा प्रयत्न सुरू आहे. रेल्वेचे खासगीकरण अंशतः झाले आहे. खाण उद्योग, तेल उद्योग, हवाई वाहतूक जल वाहतूक, खासगी कंपन्यांकडे सोपविली जाणार आहे. विमा क्षेत्र, बँक यांच्या खासगीकरणाचा प्रस्ताव पुढे आला आहे.

भारतासारखा खंडप्राय देश आपल्या गोटात असावा असे अमेरिका आणि रशिया यांना वाटत असे. तसे त्यांना वाटणे स्वाभाविक होते. तसा प्रयत्नही त्यांनी चालविला होता. पण पं. नेहरू यांनी वेगळीच भूमिका घेतली. त्यांनी आपला स्वतंत्र विचार मांडला. रशिया आणि अमेरिका यांच्याशी मैत्रीचे संबंध ठेवायचे पण त्याचवेळी त्यांच्या गटात मात्र सामील व्हायचे नाही. अलिप्त राहायचे. असे अलिप्तता धोरण त्यांनी स्वीकारली. असे करणे त्याकाळी मोठे धाडसाचे होते. रशिया आणि अमेरिकेचा वाईटपणा ओढवून घ्यायचा होता. त्यांनी अतिशय मुत्सद्देगिरीने दोघांशी मैत्री ठेवत अलिप्तता धोरण अवलंबिले. आपल्या या कार्यात त्यांनी युगोस्लाव्हीयाचे मार्शल टिटो, इजिप्तचे अध्यक्ष नासेर इंडोनेशियाचे अध्यक्ष सुकार्नो यांना बरोबर घेण्यात यश मिळविले.

जगातिल अलिप्ततावादी चळवळीचे प्रणेते म्हणून ते जगभर ओळखले गेले. पं. नेहरू यांची दुसरी ओळख शांतता चळवळीचे नेते अशीही आहे. जगातील गरीब राष्ट्रांचा विकास व्हायचा असेल तर त्यांनी आपापसात लढाया करता कामा नये. लढाईवर होणारा खर्च शिक्षण, अन्न, आरोग्य याकडे वळविला पाहिजे, अशी भूमिका ते मांडत राहिले. शेजारी राष्ट्रामध्ये जर काही वाद निर्माण झाले तर ते सामंजस्याने आणि वाटाघाटीच्या मार्गाने सुटले पाहिजेत. यासाठी लढाई होता कामा नये अशी भूमिका त्यांनी मांडली. 'पंचशील' हे तत्त्व त्यातून विकसित झाले. भारत अशी भूमिका मांडत असतानाच १९६२ साली सरहद्दीच्या प्रश्नावरून चीनने भारतावर आक्रमण केले. त्याचा पं. नेहरू यांना मोठा धक्का बसला. त्यांचे जे विरोधक होते. त्यांना पं. नेहरू यांच्यावर टीका करण्याची संधी मिळाली. यामध्ये त्यावेळचा जनसंघ हा पक्ष आघाडीवर होता.

देशाचा विकास करायचा झाल्यास देशात संशोधन संस्था निर्माण करणे आवश्यक असते तसेच त्या संस्था चालविण्यासाठी श्रेष्ठ दर्जाचे शास्त्रज्ञही तयार करावे लागतात. पं. नेहरूंना त्याची जाणीव होती. त्यांनी शास्त्रज्ञांची एक फळीच निर्माण केली. डॉ. पी. सी. मोहलनवीस, डॉ. मेघनाद साहा, डॉ. विक्रम साराभाई, डॉ. होमी भाभा, सर एम. विश्वेश्वरय्या यामध्ये आणखीही काही नावांचा समावेश करता येईल ही जागतिक किर्तीची माणसे होती. यांनी भारतात राहावे. संशोधन करावे अशा उद्देशाने त्यांना संशोधन संस्था स्थापन करण्यास सांगितले. त्याप्रमाणे या शास्त्रज्ञानी संस्था स्थापन केल्या व त्या यशस्वीपणे चालवून दाखविल्या.

तरुणांच्या अभ्यासू वृत्तीला चालना देण्यासाठी सन १९५१ साली 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' या संशोधन आणि शिक्षण संस्थेची दिल्ली येथे सुरुवात केली. पाठोपाठ मुंबई, खरगपूर, चेन्नई येथे संस्था सुरू झाल्या व त्या संस्थांनी केवळ देशाच्या वैज्ञानिक प्रगतीला चालना दिली असे नाही तर जगाच्या प्रगतीला हातभार लावला असल्याचे पाहायला मिळते. आय. आय. टी.मध्ये शिक्षण घेतलेला विद्यार्थी हा इतर विद्यार्थ्यांपेक्षा खूप वेगळा असतो.

देशात विद्यापीठे स्थापन झाली पाहिजे व त्या विद्यापीठांना मार्गदर्शन करण्यासाठी एक उच्चस्तरीय संस्था असावी या उद्देशाने सन १९५३ साली युनिव्हर्सिटी ग्रॅण्ट कमिशनची स्थापना करण्यात आली. या संस्थेची जबाबदारी तत्कालीन शिक्षणमंत्री मौलाना आझाद यांचेवर सोपविण्यात आली. देशातील शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेताना. मौलाना आझाद यांचे योगदान ध्यानात घ्यावेच लागेल. देशातील विद्यार्थ्यांना आपण जे शिक्षण देतो ते राज्यघटनेने केलेल्या मार्गदर्शनानुसार असायला हवे अशी मौलाना आझाद यांची भूमिका असायची. पं. नेहरू यांनी याच भूमिकेचा पुरस्कार केला होता. या स्वायत्त संस्थेने खूप चांगले काम केले आहे. मात्र आता या संस्थेचे भवितव्य धोक्यात आले आहे. शिक्षण व्यवस्थेचे खासगीकरण करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतल्यामुळे या संस्थेची स्वायत्तता आणि उपयुक्तता कितपत शिल्लक राहील हा प्रश्न आहे.

पं. नेहरुनी सांस्कृतिक क्षेत्राच्या विकासाकडे गांभीर्याने पाहिले समाजाचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. त्यासाठी त्यांनी १९५४ साली ललित कला अकादमीची स्थापना केली. दिल्ली येथे तिचे मध्यवर्ती कार्यालय केले आणि देशाच्या विविध भागांत शाखा काढल्या. असे करून त्यांनी कला क्षेत्राला चालना दिली. सन १९६० साली फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन

इन्स्टिट्यूट या संस्थेची स्थापना करून चित्रपट क्षेत्राला चालना दिली. कला क्षेत्राकडे लक्ष देत असतानाच त्यांचे क्रीडा क्षेत्राकडेही लक्ष होते. सन १९६१ साली त्यांनी पतियाळा येथे नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्सची स्थापना केली आणि खेळाडू घडविण्याचे काम सुरू केले. हे सर्व पाहिले की, असे म्हणता येते की संस्था उभारणीचे काम त्यांनी जेवढे केले तेवढे आणखी कोणी केले नाही. त्यांनी स्थापन केलेल्या संस्था दीर्घकाळ कार्यरत राहिल्या. त्या लोकाभिमुख व धर्मनिरपेक्ष राहिल्या आणि आता मात्र त्यांचे स्वरूप बदलत आहे. इतके बदलत आहे की या संस्थाही एखाद्या खासगी कंपनी किंवा कॉर्पोरेटकडे चालविण्यास देण्यात आल्या तर आश्चर्य वाटायला नको.

स्वातंत्र्यपूर्व काळात पं. नेहरू यांनी केलेले चळवळीचे नेतृत्व ब्रिटिशांविरोधात संघर्ष करताना सोसलेला तुरुंगवास, केलेला प्रचंड प्रवास त्या काळात आजच्या सारख्या सुविधा नव्हत्या. ग्रामीण भागात वीज नव्हती त्यामुळे सभेसाठी लाऊड स्पीकरही नसायचा. त्यामुळे सभेत मोठ्याने बोलावे लागे, कधी कधी तर बैलगाडीतून प्रवास करावा लागे. तो त्यांनी केला. स्वातंत्र्योत्तर काळात तर त्यांच्यापुढे आव्हानांचा डोंगरच होता. पण अशा काळातही त्यांची अभ्यासू वृत्ती कमी झाली नाही. उलट ती वाढतच गेल्याचे दिसते. सन १९३८ साली त्यांनी नॅशनल हेरॉल्ड हे वृत्तपत्र सुरू केले. ते संस्थापक संपादक. या वृत्तपत्रात नियमितपणे लिहीत असत. चळवळीच्या नेत्याने कार्यकर्त्यांसाठी आणि जनतेसाठी सातत्याने लिहायचे असते असे तो काळ होता. म. गांधी हरिजन, यंग इंडियामध्ये लिहीत. मौलाना आझाद त्यांच्या 'अल हिलाल' या नियतकालिकात लिहीत असत. वृत्तपत्रीय लेखनाबरोबरच पं. नेहरू यांनी 'भारताचा शोध', 'आत्मचरित्र', 'इंदिरेस पत्रे' हे ग्रंथ लिहिले. हे ग्रंथ त्याकाळात देशातच नव्हे, तर जगभरात वाचले गेले. आजही ते वाचले जातात. या त्यांच्या लेखनामुळे ते श्रेष्ठ दर्जाचे साहित्यिक म्हणून ओळखले गेले. आजही त्यांचे लेखन देश विदेशात आवडीने वाचले जाते. साहित्य क्षेत्राला त्यांनी दिलेले योगदान खूप मोठे आहे. साहित्यासाठी दिले जाणारे नोबेल पारितोषिक त्यांना मिळावे असे मत त्या काळात व्यक्त करण्यात येई. पण त्यांची साम्राज्यवादविरोधी भूमिका आणि कम्युनिस्ट चळवळीविषयी असलेली सहानुभूती यामुळे ते त्यांना दिले गेले नाही असे अनेकांचे मत आहे.

लेखक म्हणून असे ते थोर होते तसेच ते उत्तम वक्ते होते. जनमानसाची नस ओळखणारे व त्याप्रमाणे बोलणारे होते. त्यांची दोन भाषणे महत्त्वाची मानली जातात. ३१ डिसेंबर १९२९ रोजी लाहोर येथील काँग्रेसच्या अधिवेशनात लाखोंच्या जनसमुदायापुढे त्यांनी केलेले भाषण आणि दुसरे स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला जनतेशी साधलेला संवाद 'नियतीशी करार' म्हणून ते भाषण प्रसिद्ध आहे. पं. नेहरू श्रेष्ठ दर्जाचे संसदपटू होते. त्यांच्या काळात बॅ. नाथ पै, कॉ. भूपेश गुप्ता, कॉ. डांगे, कॉ. ए. के. गोपालन अशी दिग्गज मंडळी होती. एकेका विषयावर तासन्तास चर्चा चालायची विविध राजकीय विचारांची ही नेते मंडळी एकमेकांचा विचार समजून घेत. एकमेकांचा आदर करीत. आज आपण काय पाहतो आहोत. सत्ताधारी पक्ष जो आहे तो इतर कोणाचा विचार समजून घ्यायला तयार नाही. संसदीय कामकाज चालविण्याऐवजी ते गुंडाळण्याकडे भर देण्यात येतो. सत्ताधारी पक्षावर टीका करणे म्हणजे देशद्रोह करणे असा विचार समाजात रुजविला जात आहे. सरकारविरोधात आंदोलन करणाऱ्यांचा पं. नेहरू आदर करीत असत. विरोधकांचे म्हणणे काय आहे हे समजून घेत असत. त्यांना चर्चेला बोलवत असत. आज तसे होताना दिसत नाही. गेले वर्षभर शेतकरी आंदोलन करीत आहेत. पण आपले पंतप्रधान त्यांच्याशी बोलायलाही तयार नाहीत. या विषयावर मी आपणाशी बोलणार नाही म्हणतात. परिस्थिती उत्तरोत्तर गंभीर होत चालली आहे हे खरे.

लोकशाही व्यवस्थेत टीका, आत्मटीका यांना महत्त्व असते. पं. नेहरू याबाबत खूप सजग असत. आपणावर होणाऱ्या टीकेकडे ते सकारात्मक दृष्टिकोनातून बघत. टीकेविषयीचा त्यांच्या दृष्टिकोन हा लोकशाहीला पूरक असाच होता. पं. नेहरूंच्या एका टीकाकाराने असे नोंदविले आहे, की ''नेहरू फारच लोकप्रिय आहेत. त्यांना त्यांची पूजा केलेली आवडते, ते दृढनिश्चयी आहेत. उत्साही आहेत तेवढेच ते गर्विष्ठही आहेत. कोणतेही काम लवकर झाले पाहिजे म्हणून तत्परही असतात. ते उतावळेही आहेत. म्हणून लोकशाहीचा धिमा मार्ग त्यांना परवडेल की नाही हे सांगता येत नाही. या सगळ्यांवरून त्यांच्यातून एखादा भारतीय सीझर - हुकूमशहा निर्माण होण्याचा संभव आहे. परिस्थितीत जरा बदल झाला तर हा माणूस हुकूमशहा व्हायला वेळ लागणार नाही. मात्र त्यावेळीही तोंडात लोकसत्तेची व समाजवादाची भाषा असेल. वगैरे, वगैरे.''

सन १९३८ साली 'मॉडर्न रिव्ह्यू' या इंग्रजी मासिकात हा लेख प्रसिद्ध झाला. सर्वत्र खळबळ माजली. लेखक कोण? टीकाकार कोण? यांची शोधाशोध झाली. शेवटी समजले. या लेखाचे लेखक होते खुद्द जवाहरलाल नेहरूच, लोकशाही, टीका, आत्मटीका अशा मूल्यांची नेहरुंना किती कदर होती हे यावरून लक्षात येते. पत्रकारितेच्या, प्रसिद्धी माध्यमांच्या क्षेत्रात आज जे काही चालले आहे ते पाहता पं. नेहरूंचे वेगळेपण सिद्ध होते.

विचाराने समाजवादी असलेल्या पं. नेहरूंना भारतात समाजवादी समाजव्यवस्था निर्माण व्हावी, असे वाटत होते. मात्र त्यांना ते शक्य झाले नाही. त्यांच्याच काँग्रेस पक्षातील अनेकांचा समाजवादी विचारांना विरोध होता. त्यांना बाजूला सारून व देशातील इतर डाव्या पुरोगामी शक्तींना सोबत घेऊन त्यांना काही वेगळा मार्ग अनुसरता आला असता काय? असा एक प्रश्न नेहमी चर्चेत येत असतो. सत्य हेच आहे की तसे काही घडू शकले नाही. पण तरीही पं. नेहरूंची प्रतिमाही समाजवादी पुरोगामी विचारवंत आणि सर्वांना विश्वासात घेऊन पुढे जाणारा नेता अशीच राहिली.

❖❖❖

# आठवणीतल्या कमलादी...

■ प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार

लोकप्रिय अभिनेता आमीर खान सादर करीत असलेल्या 'सत्यमेव जयते' या टीव्ही कार्यक्रमाच्या माध्यमातून 'कमला भसीन' यांचं नाव घराघरात पोहोचलं. सामाजिक कार्याच्या विशेषत: स्त्री-पुरुष समानतेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था-व्यक्ती-कार्यकर्त्यांना आणि समाजशास्त्राच्या अध्यापक- संशोधक नि अभ्यासकांना सुपरिचित असलेल्या कमलादी या कार्यक्रमामुळे आम जनतेपर्यंत पोहोचल्या. त्या केवळ स्त्रीवादी विचारवंत नव्हत्या तर त्या लिंगभाव-शिक्षण-मानवी विकास-मानवी हक्क यांसारख्या मुद्द्यांशी निगडित प्रश्नांची सूक्ष्म जाणीव असलेल्या सामाजिक शास्त्रज्ञ होत्या. स्त्री-पुरुष समानतेचा जागर घालणाऱ्या कमलादी गेल्या ३५ वर्षांपेक्षाही जास्त काळापासून अभ्यासक, तत्त्वचिंतक नि कार्यकर्त्या अशा विविध भूमिकांमधून सक्रिय योगदान देत होत्या.

**''मी अशा अनेक स्त्रियांना ओळखते की ज्या पूर्णत: पितृसत्ताकवादी आहेत आणि अशा अनेक पुरुषांनाही ओळखते की ज्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य हे स्त्रियांच्या हक्कांसाठी लढा देण्यात घालविले आहे. स्त्रीवाद हा जैविक नाही, तर स्त्रीवाद ही एक विचारधारा आहे'',** असं त्यांचं मत होतं. साडेतीन दशकांपूर्वी त्यांनी त्यांच्या अनेक समविचारी मैत्रिणी-मित्र यांना एकत्र करून 'संगत' (SANGAT- South Asian Network for Gender Activity and Training) या नावाचे नेटवर्क सुरू केलं होतं. याच्या मार्फत त्या आशियाई देशातल्या लोकांसाठी एक महिन्याचा निवासी अभ्यासक्रम कोर्स चालवायच्या. (South Asian Feminist Capacity Building Course on Gender, Sustainable Livelihoods, Human Rights and Peace) हे त्या कोर्सचे नाव. या कोर्ससाठी फक्त सामाजिकशास्त्रांचे विद्यार्थी-अभ्यासक-संशोधक, सामाजिक कार्यकर्तेच प्रवेश घेतात असं नाही तर व्यापारी-अभियंता-डॉक्टर्स-पत्रकार-राजकीय नेते अशा भिन्न-भिन्न व्यवसायातले लोकही प्रवेश घेतात.

महाराष्ट्रातल्या स्वयंसेवी संघटनांच्या वतीने आयोजित केल्या जाणाऱ्या महाराष्ट्र महिला हिंसामुक्ती परिषदेचे आयोजन डिसेंबर २०१९ मध्ये नाशकात करण्यात आलं. या तिसऱ्या अधिवेशनाच्या सहआयोजनाची जबाबदारी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाने स्वीकारली होती. कमला भसीन यांनी या अधिवेशनाचे उद्‌घाटन केलं. या परिषदेच्या निमित्ताने त्या प्रथमच विद्यापीठात आल्या.

कमला भसीन विद्यापीठात येत आहेत, हे औचित्य साधून त्यांच्याविषयीचं एखादे पुस्तक सावित्रीबाई फुले अध्यासनाच्या वतीने काढता येईल, असा विचार आला. त्यांनी इंग्रजीत लिहिलेल्या पुस्तकांचा परिचय करून देणारे पुस्तक प्रकाशित करावे, असं ठरवलं. आणि हे पुस्तक त्यांच्याच हस्ते महाराष्ट्र महिला हिंसा मुक्ती परिषदेच्या उद्‌घाटन समारंभात प्रकाशित करावं, असंही ठरवण्यात आलं. त्या दृष्टीने मग तयारी सुरू केली. सगळ्यात आधी त्यांची

इंग्रजी पुस्तकं माझ्याकडे उपलब्ध केलीत. १. Understanding Gender २. What is Patriarchy? ३. Understanding Masculinity ४. Feminism and its Relevance in South Asia ५. If Only Someone Had Broken the Silence ही त्यांची पाचही पुस्तके खूप महत्त्वाची आणि मूलभूत मांडणी करणारी आहेत. या पाच पुस्तकांचा परिचय कोण लिहून देईल याचा शोध घेतला. डॉ. नीलम यादव, टाटा सामाजिक विज्ञान संस्था, तुळजापूर (उस्मानाबाद), डॉ. धनंजय सोनटक्के, वर्धा, सुलभा शेरताटे, नाशिक, अमोल गुट्टे, नाशिक आणि प्रा. अजय अहिर, पुणे यांना वरील पुस्तकांचा परिचय लिहून देण्याची जबाबदारी सोपवली. प्रत्येकाला त्यांच्या मागणीनुसार एकेक पुस्तक वाटून दिलं. एक-दोघांकडे मूळ इंग्रजी पुस्तक उपलब्ध नव्हतं, ते त्यांना पोहोचवलं. फक्त या पाच पुस्तकांचा परिचय असलेलं पुस्तक खूप लहान होईल असं लक्षात आलं. मग यात कमला भसीन यांच्याबाबतीत अजून मजकूर समाविष्ट करायचं ठरलं. औरंगाबादचे माझे मित्र सरस्वती भुवन महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाचे प्रमुख प्राध्यापक डॉ. संदीप चौधरी यांनी कमला भसीन यांचा परिचय करून देणारा सविस्तर लेख लिहून देण्याची जबाबदारी स्वीकारली. ज्यांच्या प्रयत्नाने महाराष्ट्र महिला हिंसा मुक्ती नाशकात आयोजित होत होती त्या 'संगिनी महिला जागृती मंडळ' या स्वयंसेवी संस्थेच्या सर्वेसर्वा आणि तडफदार नि अभ्यासू सामाजिक कार्यकर्त्या अनिता पगारे यांना कमला भसीन यांचा वर उल्लेखलेल्या कोर्सच्या निमित्ताने एक महिना सहवास लाभला होता. त्यामुळे एका कार्यकर्तीच्या नजरेतून कमला भसीन यांचे व्यक्तिचित्रण करायला त्या तयार झाल्या. मुंबईच्या 'सेहत' या स्वयंसेवी संस्थेच्या सुजाता आयरकर यांनीदेखील त्यांचे अनुभव शब्दबद्ध करायला आनंदाने होकार दिला. डॉ. नीलम यादव अमराठी असल्याने त्यांनी लेख इंग्रजीत लिहिला आणि दिलेल्या वेळेच्या आधी माझ्याकडे पाठवला. त्यामुळे मला या लेखाचा मराठी अनुवाद करायला पुरेसा वेळ मिळाला.

महाराष्ट्र महिला हिंसा परिषदेचे उद्घाटन कमला भसीन यांच्या हस्ते १९ डिसेंबर २०१९ रोजी होणार होते. त्यामुळे पुस्तक किमान २/३ दिवस आधी छापून हाती यायला हवं होतं. या दृष्टीने माझं काम सुरू झालं. सर्व लेखकांशी नियमित संपर्कात राहून लेखन वेळेवर प्राप्त होईल यासाठी मी कसोशीने प्रयत्न करीत होतो. पण या ना त्या अडचणींमुळे, लेखकांच्या दैनंदिन कार्यव्यस्ततेमुळे सगळ्यांचे लेख वेळेवर प्राप्त झाले नाहीत. सर्वांचे लेख मिळाल्यावर ते वाचून त्यानंतर मला संपादकीय लिहायचं होतं. एकूण सर्व परिस्थितीचा अदमास घेतल्यावर पुस्तक महिला हिंसा मुक्ती परिषद अधिवेशनाच्या उद्घाटन कार्यक्रमात प्रकाशित करणे शक्य होणार नाही, हे लक्षात आलं.

परिषदेची तारीख जवळ येत होती. पुस्तक तयार होत नाहीये यामुळे मला वाईट वाटत होते. पण करणार काय, इलाज नव्हता. शेवटी परिषदेच्या उद्घाटनाचा दिवस उजाडला. अनिताने कमलादी यांची ओळख करून दिली. मी माझा परिचय त्यांना दिला. माझं शिक्षण टाटा सामाजिक विज्ञान संस्थेतून झालंय नि मी काही वर्षे प्रख्यात स्त्रीवादी कार्यकर्त्या व अभ्यासक छाया दातार यांच्यासमवेत काम केलं असल्याचा त्यांना आनंद झाला. त्यांनी पहिल्याच भेटीत आपलंसं केलं. असं वाटलंच नाही की त्यांची नि माझी ही पहिलीच भेट आहे. त्यांच्या सोबत किती बोलू नि किती नाही अशी माझी अवस्था झाली होती. त्यांनी आपल्या अनोख्या शैलीत परिषदेच्या उद्घाटनाचे भाषण केलं. विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन यांना त्यांनी इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठासोबत काम केलं असल्याची आठवण करून दिली. आमचे कुलगुरू महोदय इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठातून आले आहेत. परिषदेच्या उद्घाटन समारंभात सावित्रीबाई फुले अध्यासनाचा समन्वयक या नात्याने मी मनोगत व्यक्त केलं. अध्यासनातर्फे कमलादीवर पुस्तक काढत असल्याचे सांगून त्याचे प्रकाशन आपल्या हातून करण्याची इच्छा पूर्ण न झाल्याबद्दल मी खेद व्यक्त केला. पण हे पुस्तक येणाऱ्या ३ जानेवारीला म्हणजेच क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनी प्रकाशित करण्याचं आश्वासन मी कमलादींना दिलं. त्यांनी समाधान व्यक्त केलं. उद्घाटनाचा कार्यक्रम संपल्यावर मी त्यांना विद्यापीठाच्या स्टुडिओमध्ये घेऊन गेलो. तिथे मी त्यांची मुलाखत घेतली. स्त्रीवाद-पितृसत्ता-मर्दानगीच्या संकल्पना-स्त्री-पुरुष समानता-लिंगभाव संवेदनशीलता-दलित स्त्रीवाद-स्त्री सक्षमीकरण-लैंगिकतेचे विविध पैलू-भारतीय संविधान अशा विविध मुद्द्यांवर त्यांनी आपलं रोखठोक पण अभ्यासपूर्ण विवेचन केलं. ही मुलाखत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर आणि यू-ट्यूबवर देखील उपलब्ध आहे. जेवतानादेखील त्यांच्यासमवेत अनेक मुद्द्यांवर चर्चा केली. मला त्यांच्याशी संवाद साधण्याची, गप्पा मारण्याची थेट संधी मिळाल्याबद्दल माझा आनंद गगनात मावेनासा झाला. परिषद तीन दिवसांची होती पण त्यांच्या व्यस्त कार्यबाहुल्यामुळे

त्यांना थांबता आलं नाही. आमचा whatsapp आणि फेसबुकच्या माध्यमातून संपर्क सुरु झाला. त्या फेसबुकवर अतिशय सक्रिय होत्या. वेगवेगळ्या कार्यक्रमांचे (चर्चासत्रे-परिषदा-कार्यशाळा-प्रशिक्षण सत्रे- बीज भाषण-निबंध सादरीकरण-मोर्चा-निदर्शने-अहवाल प्रकाशन-पुस्तक प्रकाशन-कार्यकर्त्यांसोबतची गाणी-गप्पा इत्यादी) फोटो आणि तपशील त्या सातत्याने टाकायच्या. त्यांचा हा शिरस्ता अखेरपर्यंत सुरू होता.

परिषदचे अधिवेशन संपल्यानंतर मी पुस्तक पूर्ण होण्यासाठी आढावा घ्यायला सुरुवात केली. कमलादी यांना परिषदेसाठी आलेल्या ३०० कार्यकर्त्यांसमोर दिलेलं आश्वासन मला सदोदित आठवत होतं. कोणत्याही परिस्थितीत ३ जानेवारी २०२० ला पुस्तक प्रकाशित करायचंच असा चंग मी बांधला होता. त्या दृष्टीने जोरदार प्रयत्न सुरू केले. लेखकांकडून लेख प्राप्त झाल्यावर त्यांचं वाचन करून, दुरुस्त्या करून ते प्रकाशकाकडे पाठवले. सर्व लेख मिळाल्यावर त्यावर आधारित संपादकीय लिहिले. प्रकाशक पुण्याचे होते. त्यांच्याशी नित्य संपर्कात राहून पुस्तकाला अंतिम रूप दिले. २ जानेवारी २०२० ला प्रकाशकाने पुस्तकांच्या प्रति पुण्याहून पाठवल्या. मला त्या रात्री ९ वाजता प्राप्त झाल्या नि हायसे वाटलं. विद्यापीठात अध्यासनातर्फे दरवर्षी ३ जानेवारीला सावित्रीबाई जयंती व्याख्यानाचे आयोजन केलं जातं. याही वेळी ते केलेलं होतं. कवयित्री-लेखिका-एकपात्री प्रयोग कलावंत प्रा. डॉ. प्रतिभा जाधव यांना या कार्यक्रमासाठी आमंत्रित केलं होतं. त्या 'सावित्री, तू होतीस म्हणूनच...' हा त्यांनीच लिहिलेला एकपात्री प्रयोग सादर करणार होत्या. शिवाय त्यांच्याच हस्ते पुस्तकाचे प्रकाशनही होणार होते. सर्वकाही सुरळीतपणे पार पडून याच दिवशी विद्यापीठाच्या प्रांगणात माझ्या 'कमला भसीन: स्त्रीवादी तत्त्वचिंतक' या संपादित पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरूंच्या उपस्थितीत झाले. (पुस्तकाचे शीर्षक प्रा. डॉ. चौधरी यांनी सुचवले आणि त्याच शीर्षकाचा लेख त्यांनी पुस्तकासाठी लिहिला आहे.) आपण कमलादी यांना दिलेला शब्द खरा करू शकलो याचा मनस्वी आनंद होऊन समाधान वाटलं. त्याच दिवशी कार्यक्रम संपल्यावर पुस्तकाच्या दोन प्रति त्यांना पोस्टाने पाठवल्या. मिळाल्यावर कमलादी यांनी आवर्जून कळवलं.

दरम्यान Lady Diver : Stories of Woman Behind the Wheel हे जयावती श्रीवास्तव यांनी संपादित केलेलं आणि नवी दिल्लीच्या 'जुबान' प्रकाशनाने प्रसिद्ध केलेलं पुस्तक माझ्या वाचनात आलं. उपजीविकेसाठी महिला वाहनचालकाचे काम करणाऱ्या स्त्रियांच्या संघर्ष यशोकथा यात आहेत. त्या मराठीत अनुवाद करायचा माझा मानस होता. मी प्रकाशकाशी संपर्क साधला. त्यांना हरकत नव्हती. पण अनुवाद करण्याची परवानगी प्रकाशकाला दिली जात असल्याने त्यांनी मला प्रकाशक शोधायला सांगितलं. मी अनुवादक म्हणून प्रसिद्ध नसल्याने मराठीतला कोण प्रकाशक तयार होईल असा विचार करून मी हा विचार सोडून दिला. पण या पुस्तकावर आधारित एखाद्या वर्तमानपत्रात सदर लिहिता येईल का हा विचार तरळून गेला. त्या दृष्टीने मी प्रयत्न करायला सुरुवात केली. एका दैनिकाने माझ्या या कल्पनेला होकार दिला. मात्र यासाठी त्यांनी पुस्तकाच्या मूळ प्रकाशकांची संमती आणायला सांगितलं. मला कमलादीची आठवण आली. कारण जुबान हे प्रकाशन स्त्रीवादी साहित्य प्रकाशित करणारे. त्यामुळे त्यांचा जुबानशी संपर्क असेलच याची खात्री होती. त्यांच्याशी फोनवर संपर्क होऊ न शकल्याने मी त्यांना ई मेल पाठवून सारी हकीकत कळवली. त्यांचा लागलीच सकारात्मक प्रतिसाद आला. त्यांनी माझी ही कल्पना जुबान प्रकाशनला सांगितली आणि मला त्या पुस्तकावर लिहायला संमतीसुद्धा द्यायला सांगितलं. कमलादीची सूचना जुबान प्रकाशनाने अव्हेरणे शक्यच नव्हतं. दुसऱ्याच दिवशी जुबान प्रकाशनाकडून संमतीचा मेल आला. मी लागलीच संबंधित दैनिकाला पाठवला. आणि जानेवारी २०२० च्या शेवटच्या आठवड्यापासून माझं महिलांसाठी प्रकाशित होणाऱ्या साप्ताहिक पुरवणीत 'फिरत्या चाकावरती' या नावाचं पाक्षिक सदर सुरू झालं. अशा रीतीने कमला भसीन यांच्यामुळे मी स्तंभलेखक झालो. त्यांचे ऋण कधीही न फिटणारे आहे.

ज्यांच्यामुळे मला कमला भसीन यांना भेटता आलं, बोलता आलं, त्या नाशिकच्या धडाडीच्या नि अभ्यासू कार्यकर्त्या अनिता पगारे यांना मार्चमध्ये कोविडने आपल्यातून हिरावून नेलं. तर २५ सप्टेंबरला कमला भसीन यांनी अखेरचा श्वास घेतला नि आपली इहलोकाची यात्रा संपवली. त्यांच्या जाण्याने पितृसत्तेची धारदार पण हसतखेळत शस्त्रक्रिया करणाऱ्या, आम जनतेशी नाळ जोडलेल्या एका विलक्षण पर्वाचा अस्त झाला. कमलादीचं अस्तित्व त्यांचं लेखन-भाषण-मुलाखती-गाणी-कविता यांच्या माध्यमातून कायम राहणार आहे, यात शंका नाही. कमला भसीन यांना भावपूर्ण आदरांजली!

(लेखक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाचे समन्वयक असून त्यांनी 'कमला भसीन: स्त्रीवादी तत्त्वचिंतक' या पुस्तकाचे संपादन केलं आहे.)

❖❖❖

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरक पत्रकारिता

■ देवेंद्र भुजबळ, ९८६९४८४८००

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रामुख्याने ओळख आहे ती भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून. जगात आजही आपली राज्य घटना एक आदर्श राज्य घटना समजली जाते. असे जरी असले तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे होते. धर्मशास्त्राचे, अर्थशास्त्राचे अभ्यासक, कामगार नेते, राजकीय पक्षाचे संस्थापक, द्रष्टे विचारवंत, विविध सामाजिक चळवळींचे जनक याबरोबरच त्यांची ओळख दूरदृष्टीचे पत्रकार अशीही आहे.त्यांची पत्रकारिता आजही प्रेरक अशीच आहे. त्यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' वृत्तपत्र सुरू केले. या ऐतिहासिक घटनेस गेल्या वर्षीच १०० वर्षे होऊन गेली आहेत.

वृत्तपत्रे जर जाहिरातदारांच्या आहारी गेली तर ती आपलं स्वातंत्र्य गमावून बसतील, हा त्यांनी त्या वेळी दिलेला इशारा आज दुर्दैवाने खरा ठरत असल्याचे दिसून येत आहे. यानिमित्ताने त्यांच्या प्रेरक, दूरदृष्टीच्या पत्रकारितेचा हा आलेख.

**दलित पत्रकारितेचा प्रारंभ :**

गोपाळ बाबा वलंगकर यांनी १८८८ मध्ये पत्रकारितेस सुरुवात केली होती. २३ ऑक्टोबर १८८८ रोजी त्यांनी 'विचार विध्वंस' नावाची पुस्तिका लिहिली होती. समाजाने निर्माण केलेल्या दृष्टचक्रातून अस्पृश्य वर्गाला बाहेर काढण्याचा ध्यास त्यांना लागलेला होता. दलित समाजातील ते पहिले पत्रकार होते, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. त्यानंतर शिवराम जानबा कांबळे यांनी 'सोमवंशी मित्र' हे पहिले साप्ताहिक प्रकाशित केले. पूर्णपणे स्वत:चे अग्रलेख लिहिणारे ते पहिले दलित पत्रकार होते. किसन फागू बंदसोडे यांनी निराश्रित हिंद नागरिक हे पत्र १९१० साली, 'विटाळ विध्वंसक' १९१३ व १९१८साली 'मजूर पत्रिका' सुरू केले. एकामागोमाग एक तीन वृत्तपत्रे सुरू करून त्यांनी जनतेचे प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला. बंदसोडे यांनी पत्रकारितेमध्ये नवीन आदर्श निर्माण केला. विदर्भातील गणेश गवई यांनी १९१४ साली ''बहिष्कृत भारत'' हे वृत्तपत्र काढले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर निश्चित भूमिकेतून पत्रकारितेकडे वळले होते. विविध जाती-जमातींच्या मतदानाच्या अधिकारांच्या संदर्भात काही कर्त्या व्यक्तींच्या साक्षी काढण्यासाठी सरकारने १९१७ साली साऊथबरो कमिशन नेमले होते. या कमिशनच्या निमित्ताने अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांसाठी झगडण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. त्यांना अस्पृश्यांचे म्हणणे जगाच्या वेशीवर टांगण्यासाठी आपल्याजवळ नेहमीसाठी एखादे साधन असावे, असे वाटले. ''पंखाशिवाय जसा पक्षी, त्याप्रमाणे समाजात विचार प्रवृत्त करण्यासाठी वृत्तपत्राची गरज असते'' हे त्यांना तीव्रपणे जाणवत होते. उपलब्ध वृत्तपत्रे तर विशिष्ट जातींचीच चाकरी करणारी, अस्पृश्यांवर अन्यायच बहुतांशी करणारी होती. याचा अर्थ वृत्तपत्राविना अस्पृश्य समाज अनाथ होता. त्यांच्याजवळ विलक्षण अशा करुण कहाण्या होत्या. या मूक समाजाच्या वेदना व विद्रोह प्रकट करण्यासाठी एखाद्या प्रकाशनपीठाची गरज होती. या गरजेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पत्रकारितेकडे वळले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेली वृत्तपत्रे :**

(१) मूकनायक : समाजाच्या वेदना व विद्रोह प्रकट करण्यासाठी त्यांनी 'मूकनायक' पाक्षिक वृत्तपत्र ३१ जानेवारी, १९२० रोजी सुरू

केले. मूक अशा अस्पृश्यांचे नायकपण - नेतेपण आपण स्वीकारल्याचे मूकनायक काढून त्यांनी जाहीर केले. मूकनायकाने त्यांच्या पुढील घणाघाती चळवळीची जणू नांदीच म्हटली. यासाठी त्यांना राजर्षी शाहू महाराज यांचे आर्थिक सहकार्य लाभले होते. त्यामुळे पहिल्या अंकाच्या संपादकीयामध्ये ही जन्मप्रतिज्ञा अशी व्यक्त केली.

''आमच्या या बहिष्कृत लोकांत होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमीच नाही. परंतु मुंबई इलाख्यात निघत असलेल्या वृत्तपत्राकडे पाहिले असता असे दिसून येईल की, त्यातील बरीचशी पत्रे विशिष्ट जातीचे हितसंबंध पाहणारी आहेत. इतर जातीच्या हिताची पर्वा त्यांना नसते. इतकेच नव्हे तर, केव्हा केव्हा त्यांना अहितकारक असेही प्रलाप त्यातून निघतात. अशा वृत्त पत्रकारांना आमचा इशारा एवढाच की, कोणतीही एखादी जात अवनत झाली तर तिच्या अवनतीचा चट्टा इतर जातींना बसल्याशिवाय राहणार नाही. समाज ही नौकाच आहे. ज्याप्रमाणे आगबोटीतून प्रवास करणाऱ्या उतारूने जाणूनबुजून इतरांचे नुकसान करावे म्हणून म्हणा किंवा आपल्या विनाशक स्वभावामुळे म्हणा, जर का इतरांच्या खोलीस छिद्र पाडले, तर सर्व बोटीबरोबर त्यालाही आधी किंवा मागाहून जलसमाधी ही घ्यावीच लागणार आहे. त्याचप्रमाणे एका जातीचे नुकसान केल्याने, अप्रत्यक्ष नुकसान करणाऱ्या जातीचेही नुकसान होणार यात बिलकूल शंका नाही. म्हणूनच स्वहितसाधू पत्रांनी इतरांचे नुकसान करून आपले हित करावयाचे पढतमुर्खाचे लक्षण शिकू नये.''

मूकनायकाचे ध्येयधोरण स्पष्ट करण्यासाठी त्यावर पुढील बिरुदावली असे.

''काय करुन आता धरुनिया भीड । नि:शक हे तोड वाजविले ॥१॥
नव्हे जगी कोण मुकियाचा जाण । सार्थक लाजोनी नव्हे हित ॥२॥

तुकारामाच्या या ओळी त्यांनी बिरुदासाठी निवडाव्या, यात केवढे तरी औचित्य आहे. वृत्तपत्राचे 'मूकनायक' हे नावही त्यांना ''नव्हे जगी कोणी मुकियाचा जाण'' या चरणावरून सुचले आहे, हे निश्चित. बाबासाहेब विलायतेला गेल्याने १९२३मध्ये 'मूकनायक' बंद पडले.

**२) बहिष्कृत भारत :**

बहिष्कृत भारत हे पाक्षिक त्यांनी ३ एप्रिल १९२७ रोजी सुरू केले. या पाक्षिकाचे ते स्वत: संपादक होते. दुसऱ्या अंकापासून बहिष्कृत भारतावर बिरुदावली म्हणून ज्ञानदेवांच्या पुढील ओव्या उद्धृत केलेल्या असत.

''आता कोंदड घेऊनि हाती । आरुढ पांइये रथी ॥
देई अलिंगन वीरवृत्ती । समाधाने ॥
जगी कीर्ती रुढवी । स्वधर्माचा मानु वाढवी ॥
इया भारापासोनि सोडवी । मेदिनी हे ॥
आता पार्थ नि:शंकु होई । या संग्रामा चित्त देई ॥
एथ हे वाचूनि काही । बोलो नये ॥
आता केवळ संग्राम । संग्रामाशिवाय दुसरे काहीही नाही ॥

**अशी युद्ध प्रेरणा ते प्रारंभापासून अस्पृश्यांमध्ये चेतवीत**

या वृत्तपत्रातील सर्व मजकूर बाबासाहेब स्वत: लिहीत. या वृत्तपत्राचे खूप वर्गणीदार झाले नाही. तसेच कायमची आर्थिक तरतूद करणे बाबासाहेबांना शक्य झाले नाही. या सर्व व्यापातापामुळे बहिष्कृत भारत १५ नोव्हेंबर १९२९ रोजी बंद पडले. या पाक्षिकाचे एकूण ३४ अंक निघाले. त्यातला ४ जानेवारी १९२९चा अंक सोडता सर्व अंकात अग्रलेख आहेत. ३१अंकांमध्ये 'प्रासंगिक विचार' या सदरामध्ये त्यांनी विविध विषयांवर लिहिले आहे. त्यांच्या स्फूट लेखांची संख्या १४५ आहे.

**बहिष्कृत भारतच्या पहिल्या अंकात बाबासाहेब म्हणतात :**

'सुधारणेचा कायदा अमलात आला आहे. इंग्रजांच्या हातची सत्ता काही प्रमाणात वरिष्ठ हिंदी लोकांच्या हाती गेली आहे. बहिष्कृत वर्गाची प्रतिनिधीच्या बाबतीत मुळीच दाद न लावता ज्याप्रमाणे एखाद्या जनावराला त्याचा निर्दयी धनी कसाबाच्या स्वाधीन करतो, त्याचप्रमाणे बहिष्कृत वर्गाच्या लोकांना त्यांच्या मायबाप सरकारने वरिष्ठ हिंदी लोकांच्या स्वाधीन केले आहे. अस्पृश्यांची स्थिती सहा वर्षांपूर्वीपेक्षा आज जास्त शोचनीय आहे. ही शोचनीय स्थिती जगजाहीर करून होत असलेली हेळसांड टाळावयाची असे, घडत असलेल्या अन्यायापासून, जुलुमापासून बचाव करावयाचा असेल तर वृत्तपत्राची जरुरी सहा वर्षांपूर्वीपेक्षा आज अधिक तीव्र आहे.

बहिष्कृत वर्गाच्या लोकांना जर त्यांच्या संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधी मिळाले नाही, तर त्यांच्या उन्नतीची इतिश्री झाली, असेच समजावे. कारण ब्रिटिश सरकारचे नि:पक्षपाती धोरण आमच्या वरिष्ठ समाजाकडून ठरवले जाईल, इतकी त्यांची मनोभूमिका शुद्ध व सात्त्विक बनलेली नाही. हा घोर प्रसंग टाळावयाचा असेल तर, आतापासूनच चळवळीला सुरुवात केली पाहिजे.'

बाबासाहेबांच्या महपरीनिर्वाणानंतर प्रबुद्ध भारत १९६१ साली बंद पडले.

**३) जनता :**

जनता वृत्तपत्राचा पहिला अंक २४ नोव्हेंबर १९३० रोजी

प्रकाशित झाला. श्री. देवराव विष्णू नाईक संपादक होते. जनता प्रारंभी पाक्षिक होते. ते ३१ ऑक्टोबर १९३१ पासून साप्ताहिक झाले.

या वृत्तपत्राची बिरुदावली ''गुलामाला तू गुलाम आहेस असे सांगा, म्हणजे तो बंड करून उठेल'' अशी होती. त्यांनी सर्व निकडीचे प्रश्न चर्चिलेच पण विशेष म्हणजे त्यांनी विलायतेहून लिहून पाठविलेली पत्रे 'जनता'त प्रकाशित झालीत.

जनता १९५५ सालापर्यंत सुरू होते. या वृत्तपत्राचे संपादक वेळोवेळी बदलले. कधी त्यात अनियमितपणा निर्माण झाला. पण तरी ते खूप दिवस टिकले. ४ फेब्रुवारी १९५६ रोजी जनताचे नामकरण प्रबुद्ध भारत असे करण्यात आले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्फुट लेखन :**

प्रासंगिक प्रश्नावर लेख हे साधारण स्फुट लेखनाचे स्वरुप असते. या स्फुट लेखनाला विषयांची मर्यादा नसली तरी विस्तार मर्यादा निश्चित असते. अशा स्फुट लेखनात लेखकाच्या व्यक्तिमत्वाचे, त्याच्या जीवनदृष्टीचे, चिकित्सकतेचे आणि त्यांच्या विचार वैशिष्ट्याचे प्रतिबिंब उमटत असते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्फुट लेखन प्राधान्याने 'बहिष्कृत भारत'मध्ये आढळते. 'जनता' आणि 'प्रबुद्ध भारतात' स्फुट लेखन प्रकाशित होत असले तरी ते डॉ. बाबासाहेबांचे नव्हते. बहिष्कृत भारताच्या १९२७ सालच्या पहिल्या वर्षाच्या अंकात ''आजकालचे प्रश्न'' या सदरांतर्गत तर दुसऱ्या वर्षी 'प्रासंगिक विचार' या सदराखाली त्यांचे स्फुटलेखन प्रकाशित झाले आहे. विषयांचे वैविध्य हे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते.

बालविवाहाचे फलित, ब्राह्मण्याचे स्वरूप, वर्णाश्रमाचा प्रभाव, मंदिर प्रवेश, मातंग समाज, शुद्धिकार्य, सत्याग्रह, आर्य समाजाचे कार्य, मनुस्मृती दहनाचे वादळ, सत्यशोधक चळवळीचा ध्येयवाद, सहभोजन, मजूर पक्ष, मिश्रविवाह, हिंदीकरण, देव, पुजारी व भक्त क्रांती, रोटी व्यवहार व बेटी व्यवहार, भिन्न वसाहती, व्यक्ती, सायमन कमिशन अशा अनेक विषयांवर बाबासाहेबांनी लेखन केले.

**डॉ. आंबेडकरांची वृत्तपत्रे आणि चळवळी :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्रातून प्रमुख चळवळी यथार्थपणे चालविल्या. त्या अशा :

१) कोल्हापूरजवळ माणगाव येथे परिषद घेऊन बाबासाहेबांनी दलितांचे प्रश्न मांडले. राजर्षी शाहू महाराजांनी या परिषदेत डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाचे स्वागत करून त्यांच्याकडून या समस्यांना गती मिळेल, असे अभिवचन दिले.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. त्याचे वर्तमान त्यांच्या बहिष्कृत भारत या वृत्तपत्रात आले आहे.

३) नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह हा एक महत्त्वाचा टप्पा होता. या चळवळीचे प्रतिबिंब त्यांच्या वृत्तपत्रातून उमटले आहे.

४) डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती दहन करून जातीव्यवस्थेला विरोध केला.

५) सामाजिक न्याय चळवळीत त्यांनी येवला येथे १९३५ साली 'आपण हिंदू जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही' अशी घोषणा केली.

**डॉ. बाबासाहेबांचे विचार आणि सद्य:स्थिती :**

बाबासाहेब हे सव्यसाची पत्रकार होते. सामाजिक प्रबोधन आणि सामाजिक न्याय या तत्वांचा त्यांनी आग्रह धरलेला होता. त्यांची सर्व पत्रे याच ध्येयवादाने भारलेली होती. नैतिकता हा तर त्यांनी वृत्तपत्रसृष्टीचा कणाच मानला होता. वृत्तपत्र हे जर जनकल्याणाचे साधन असेल, तर मग पीत पत्रकारिता ही निषेधार्हच मानली पाहिजे.

महाराष्ट्राला ध्येयशील पत्रकारितेची परंपरा आहे. म्हणून व्यथित अंत:करणाने पण परखडपणे आपल्या ध्येयापासून वंचित होणाऱ्या पत्रांना त्यांनी आपल्या मूळ बैठकांची जाणीव दिली. वृत्तपत्रांनी आचारसंहिता पाळली नाही आणि तंत्र स्वैर असले तर अज्ञजन रानभेरी होतील, असे त्यांना वाटत होते.

भडक, विकृत आणि भावनांना आवाहन करणारे लेख लोकमानस घडवू शकणार नाहीत, लोकजीवनाला नवे परिमाण देऊ शकणार नाही,अशी त्यांची खात्री होती. वृत्तपत्राचा खप वाढणे म्हणजे लोकमनाला संस्कारित करणारी विधायकता नव्हे. नि:पक्षपातीपणाचा अभाव आणि न्यायोचित लोककल्याणाच्या विचारांशी फारकत, लोकमनाची व लोकमताची अविकृत जडणघडण करू शकत नाही, असा त्यांचा ठाम विचार होता. वृत्तपत्र हे शोषणाचे माध्यम बनविणाऱ्या प्रवृत्तींना त्यांनी धारेवर धरले होते.

त्यांच्या मते व्यक्तिपूजा ही भारतातील अनेक पत्रांना लागलेली कीड आहे. व्यक्तिपूजा आंधळी असते. त्यामुळे नीतिमत्ता ढळते. म्हणून वृत्तपत्रांनी नीतिमत्तेला बाधा येणार नाही आणि सत्यापलापचाा सूर बदलणार नाही ह्याची काळजी घेतली पाहिजे. वृत्तपत्र प्रपंच म्हणजे नितिमत्तेचा प्रपंच अशी त्यांची धारणा होती.

जाहिरातीशिवाय वृत्तपत्रे जगू शकत नाही, हे खरे असले तरी वृत्तपत्रांनी जाहिरातीच्या आहारी जावे का? आणि कितपत जावे?

आर्थिक कारणांसाठी जाहिराती आवश्यक असल्या, तरी कोणत्या जाहिराती प्रकाशित कराव्यात या संबंधी संहिता पाहायला हवी, असे ते म्हणत. जाहिरातीची उद्दिष्टे आणि जाहिरात करण्याची पद्धती यात विरोध निर्माण झाला की, जाहिराती करण्यामागील तत्त्व भ्रष्ट होते, असा त्यांचा दावा असे. जाहिरात आणि नितिमत्ता यांचा अन्योन्यसंबंध बाबासाहेबांना अपरिहार्य वाटे. समाज उन्नतीचे साधन म्हणून त्यांनी वृत्तपत्राकडे पाहिले. लौकिक ऋण फेडण्यासाठी त्यांनी वृत्तपत्राचा प्रभावीपणे वापर केला.

बाबासाहेबांची पत्रकारिता या विषयावर डॉ. गंगाधर पानतावणे व डॉ. विजया इंगोले यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे पीएचडी प्रदान करण्यात आलेली आहे. डॉ. गंगाधर पानतावणे यांचे संशोधन ग्रंथरूपाने प्रकाशित झाले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून मांडलेले विचार, भूमिका आजही तंतोतंत लागू पडते, यावरुनच त्यांची दूरदृष्टी आणि विचारांची खोली दिसून येते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट :**

१८९१, एप्रिल १४ , जन्म : महू, मध्य प्रदेश.

१९००, नोव्हेंबर – सातारा येथील शासकीय विद्यालयात प्रवेश.

१९०८, जानेवारी – मुंबई विद्यापीठाची मॅट्रिक परीक्षा उत्तीण.

१९१३, जानेवारी – पर्शियन आणि इंग्रजी घेऊन बी. ए. १९१३, जुलै – अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात न्युयार्क सयाजीराव गायकवाड यांची शिष्यवृत्ती घेऊन अभ्यासक्रमासाठी दाखल.

१९१५ – अर्थशास्त्र हा प्रधान विषय घेऊन एम.ए.

१९१६, मे - 'दि कास्ट इन इंडिया' या निबंधाचे वाचन. हा त्यांचा पहिला प्रकाशित निबंध.

१९१६, जून – स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स व पोलिटिकल सायन्स, लंडन येथे दाखल.

१९१७ – कोलंबिया विद्यापीठात पीएचडी पूण.

१९१७ – 'स्मॉल होल्डिंग्ज इन इंडिया अँड देअर रेमिडिज' प्रकाशित.

१९१८, नोव्हेंबर – मुंबईच्या सिडेनहॅम महाविद्यालयात राजकीय अर्थशास्त्राचे प्राध्यापक झाले.

१९२०, जानेवारी- 'मूकनायक' सुरु केले.

१९२१, जून – लंडन विद्यापीठाची एमएसस्सी ही अर्थशास्त्रातील पदवी मिळवली.

१९२३, मार्च –'दि प्रॉब्लेम ऑफ रुपी' या प्रबंधाला अर्थशास्त्रातील डी.एस्सी. ही सर्वोच्च पदवी.

१९२६– मुंबई शासनात एम.एल.सी. म्हणून नियुक्ती.

१९२६– मार्च – महाड येथे चवदार तळे सत्याग्रह

१९२७– एप्रिल – बहिष्त भारत सुरु केले.

१९२८– जून – सरकारी विधी महाविद्यालयात प्राध्यापक.

१९३० – जनता पत्र सुरु केले.

१९३० ते १९३५ – नाशिकमध्ये काळाराम मंदिर सत्याग्रह.

१९३० ते ३२-गोलमेज परिषदेत अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून सहभागी.

१९३२, सप्टेंबर – पुणे करार.

१९३५, जून – मुंबईच्या सरकारी विधी महाविद्यालयाचे प्राचार्य.

१९३५, ऑक्टोबर – हिंदू धर्मत्यागाची येवला येथे घोषणा.

१९३६, ऑगस्ट – स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना.

१९४५, जुलै – पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना.

१९४६, ऑक्टोबर –''हू वेअर शुद्राज'' प्रकाशित.

१९४७, ऑगस्ट – भारतीय घटना समितीचे अध्यक्ष.

१९४७, ऑगस्ट – स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री.

१९४९, नोव्हेंबर – भारतीय संविधान सादर.

१९५०, जून – औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना.

१९५२, मार्च – कोलंबिया विद्यापीठाने एलएलडी पदवी दिली.

१९५५, मे – भारतीय बौद्ध महासभेची स्थापना.

१९५५ – प्रबुद्ध भारत सुरु केले.

१९५६, ऑक्टोबर १४ –नागपूर येथे बौद्ध धर्माचा स्वीकार.

१९५६,नोव्हेंबर – जागतिक बौद्ध परिषद,काठमांडू ,नेपाळ येथे प्रतिनिधी म्हणून हजर.

१९५६, डिसेंबर ६– दिल्ली येथे महापरिनिर्वाण.

१९५७ –'बुद्ध अँड हिज धम्म' ग्रंथाचे प्रकाशन

(लेखक हे न्यूज स्टोरी टुडे या आंतरराष्ट्रीय वेब पोर्टलचे संपादक असून निवृत्त माहिती संचालक आहेत. पत्रकारिता, दूरदर्शन, शासकीय जनसंपर्क यात ते ३५ वर्षे कार्यरत असून ते पत्रकारितेचे अभ्यासक आहेत.)

❖❖❖

# त्रेसष्ट कोटी युवकांचा देश आणि देशाला विदीर्ण करणारा अमली पदार्थांचा हैदोस

■ **डॉ. अजित मगदुम,** मो. ७५०६०६७७०९

२ ऑक्टोबर म्हणजे गांधी जयंतीदिनी मुंबईहून गोव्याला जाणाऱ्या एका प्रवासी जहाजावर झालेल्या रेव्ह पार्टीत अमली पदार्थांच्या वापरामुळे सबंध देशभर खळबळ माजली. ही घटना उघडकीस आणली. याचे मुख्य कारण म्हणजे एन. मेनन टाकलेल्या छाप्यात सिनेसृष्टीतील 'किंग खान' संबोधले गेलेल्या शाहरूख खान याचा पुत्र आर्यन व सिनेजगतातील इतर ७ जणांकडे सापडलेले अमली पदार्थ व त्यामुळे त्यांच्यावर झालेली अटकेची कारवाई. तेव्हापासून हा लेख लिहून होईपर्यंत समाजमाध्यमे आणि दूरचित्रवाणीवर या सनसनाटी बातमीमुळे अनेक गुंतागुंतीचे धागेदोरे कोर्टातून त्यांच्या जामिनासाठी होणारे शर्थीचे प्रयत्न, यात राजकारण्यांनी घेतलेली उडी, एनसीबीचे धडाकेबाज अधिकारी समीर वानखडे यांच्यावर होत असलेले दोषारोप या सर्वांचा एक झंझावात समाजजीवनात सुरू आहे.

या आधी अभिनेता सुशांत सिंग यांच्या आत्महत्या प्रकरणाने चंदेरी दुनियेतील तारे-तारकांचे ड्रग्ज कनेक्शन उजेडात आणले गेले होते. अमली पदार्थांच्या व्यवहार-विश्वापासून सामान्य माणूस तसा अनभिज्ञ असतो. परंतु एन.सी.बी. म्हणजे नार्कोटिक कंट्रोल ब्युरोचे झोनल डिरेक्टरपदी समीर वानखेडे आल्यापासून अमली पदार्थाच्या तस्करी व वापरावर धडाडीने होत असलेल्या कारवायांमुळें एनसीबी हा शब्द लोकांच्या कानावर वारंवार येऊ लागला. शासनयंत्रणेतील एखादाच अधिकारी आपल्या पदाचं मोल दाखवून देतो. परंतु आपल्याकडे राजकारण इतके हिणकस झाले आहे की अशा अधिकाऱ्यांना पाठबळ देण्याऐवजी स्वत:चे हितसंबंध जपण्यासाठी त्याच्या कामात आडकाठी आणण्याचे प्रयत्न होतात. असे अधिकारी जनतेला हवे असतात. पण पुढाऱ्यांना आपली पोळी भाजत नसल्याने ते नकोसे वाटतात. कार्यालयांच्या वरिष्ठांनाही ते डोईजड वाटतात तसे वानखेडेंचे होताना दिसते हे आपले दुदैव.

नुकतेच सप्टेंबर महिन्यात गुजरातमधील मुंद्रा बंदरात २१,००० कोटींचे हेरॉईन साबणवड्याच्या रूपाने अफगाणिस्तानातून आलेले पकडून ते जप्त करण्यात आले. हे हेरॉईन चेन्नई येथील एका ट्रेडिंग कंपनीने आयात केले होते पण आंतरराष्ट्रीय सीमेवरून भारतात ते आलेच कसे? त्याची पाळेमुळे शोधली पाहिजेत. यात कोणकोणाचा हात आहे. त्यांना शोधून त्याच्यावर तात्काळ कारवाई झाली पाहिजे. आपल्या देशातील तरुण पिढीला नासवण्याचे काम आंतरराष्ट्रीय स्तरावून होत आहे. हे ओळखणे गरजेचे आहे.

अमली पदार्थांच्या तस्करीत प्रचंड मोठ्या प्रमाणात साठा मिळतो. त्यामुळे सिनेजगगातील दिपिका पदुकोण, रिया चक्रवर्ती, ममता कुलकर्णी अशा अनेकांचं ड्रग कनेक्शन अलिकडच्या काळात समोर आले आहे. आता ड्रग्जमधील पैशाचं आकर्षण हे उच्चभ्रूंपुरतं सीमित राहिलं नसून मध्यमवर्गीय माणसालासुद्धा या तस्करीतून एकदम श्रीमंत होण्याची स्वप्ने पडत आहेत. गेल्या आठवड्यातच (सप्टेंबरचा शेवटचा आठवडा) एका कुटुंबातील ४ जणांना काश्मीरहून शुद्ध स्वरूपाचं साडेचौदा कोटींचं २४ किलो चरस आणताना पकडले व त्यांना अटक केल्याची बातमी 'टाइम्स ऑफ इंडिया' मध्ये

प्रसिद्ध झाली होती. जम्मू काश्मीर व हिमाचल प्रदेश येथून चरसची तस्करी होऊन ते महाराष्ट्र, गुजरात व गोव्यात आणले जाते.

**आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ वाहतुकीच्या मार्गावर भारत**

एका बाजूला आंतरराष्ट्रीय अमली पदार्थाच्या तस्करीचा मार्ग व दुसऱ्या बाजूला अफू लागवडीचा पट्टा अशा कोंडीत सापडल्याने ड्रग्ज तस्करीचा मुकाबला करणे आपल्या देशाला मोठ्या आव्हानाला सामोरे जावे लागत आहे. एका बाजूला दक्षिण पूर्वेकडील म्यानमार, थायलंड, लाओस हा सुवर्ण त्रिकोण (Golden Triangle) व दुसऱ्या बाजूला दक्षिण पश्चिमेकडील अफगाणिस्तान, पाकिस्तान व इराण हा सुवर्ण चंद्रकोर (Golden Crecent) ज्यामुळे आपल्या देशात अमली पदार्थांचा सुळसुळाट झाला आहे. ज्यामुळे सीमेवरील राज्यांना मोठा फटका बसला आहे. एकेकाळचा जवानांचा सुजलाम-सुफलाम्-पंजाब आतून खिळखिळा झाला आहे. त्यापाठोपाठ उत्तरांचल, हरियाणा, त्रिपुरा, मिझोराम, मेघालय इ. राज्यांत अमली पदार्थाच्या वाहतुकीने हैदोस मांडला आहे. ही भौगोलिक परिस्थिती काहींशी कारणीभूत असली तरी प्रशासन, पोलीस, राजकारणी यांच्यातील मिलीभगत हे सर्वात मोठे कारण आहे.

**अमली पदार्थ कोणते?**

सर्व प्रकारची मद्ये, तंबाखूजन्य पदार्थ हीपण मादक द्रव्येच आहेत. अफू, गांजा, चरस, दतुरा या पूर्वीपासून वापरात असलेल्या अमली पदार्थांपासून ते अलीकडच्या कोकेन, हेरॉईन, इफेड्रीन, ॲम्फेटिमाईन, एल. एस. डी., एम. डी. एम. कॅट, म्याऊ म्याऊ, के २, स्पाईस, आयव्हरी वेव्ह इ. अनेक सिंथेटिक आणि विशेष म्हणजे डिझाईनर ड्रग्जचं एक भयंकर वादळ आपल्या घराच्या दारापर्यंत येऊन ठेपलं आहे. भरीत भर म्हणजे हे पदार्थ सुटे न घेता कफ सिरप, रम, पेप्सी किंवा कोकमध्ये मिश्रण करून घेण्याची टूम नव्यांना, विशेषत: तरुणींना या जाळ्यात अडकवण्यासाठी आकर्षण ठरत आहे.

अमली पदार्थांच्या वापराचे अनेकविध मार्ग आहेत. तोंडावाटे सेवन करण्याबरोबर नाकावाटे हुंगणे, धूर आत घेणे, इंजेक्ट करणे इ. काही पद्धती आहेत. मध्यंतरी पेपर ड्रग्जचा प्रकार प्रसिद्धीस आला. एल. एस. डी. सोल्युशनचे काही थेंब स्टिकरच्या आकाराच्या कागदावर टाकले जातात व ते जिभेवर ठेवले की विरघळते व त्याची नशाही येते.

**कोण आहेत हे अमली पदार्थांचं सेवन करणारे?**

काही वर्षांपूर्वी कामधंदा सुटलेले, वैफल्यग्रस्त, जीवनात अपयशी ठरले आहेत अशी भावना बाळगणारे, भणंग, कर्जबाजारी इ. माणसं जुन्या पडक्या इमारतीत, उड्डाणपुलाखाली, वर्दळ नसलेल्या, अंधाऱ्या जागी बसून अमली पदार्थ-चरस, गांजा, हशीशचं सेवन करीत बसलेले असायचे. पण अलीकडे गेल्या दोन दशकांत हे चित्र बदलले आहे. नवीन 'अर्बन जंकी' पिढी, शिकलेले, १२-१४ तास काम करणारी, कॉल सेंटर्स, मीडिया, आय. टी. क्षेत्रातील तसेच रात्रपाळी करणारी, तरुण-तरुणी, ''पैसा फेकला की जगात काहीही मिळतं.'' अशा विचारांची मुलं-मुली ताणतणावाचा शॉर्ट कट उतारा म्हणून सिगरेट, दारू, गांजा, कोकेन, मेथकडे वळली आहेत, नव्हे 'हूक' झाली आहेत. पब्ज, क्लब्ज, पार्ट्यांद्वारे कूल होण्यासाठी नशेच्या अत्युच्च शिखरावरील 'हाय' मिळवायचं म्हणजे या जगात ड्रग्जशिवाय आहे तरी काय? त्यामुळे दारू, तंबाखूच्या व्यसनात या स्मार्ट तरुणाईला स्वारस्य राहिले नाही. अर्थात ही व्यसनं चांगली आहेत असं नव्हे. दारू–तंबाखूचं व्यसनही तितकंच धोकादायक आणि जीव घेणारं आहे यात संदेह असायचं कारण नाही.

**उपलब्धीचे मार्ग**

नुसत्या मुंबई शहरात हजारो ड्रग पेडलर (विक्रेते) असून त्यांची संख्या काढणे अवघड आहे. अलीकडे महिला पेडलर्सची संख्या लक्षणीय वाढली आहे. अनेक झोपडपट्टी भागात वृद्ध किंवा अपंग महिलांकडे छोट्या प्रमाणातील चरस, गांजा विक्रीचे काम चाणाक्ष दलालांनी दिलेले दिसते. अपण उच्चभ्रू समाजातील तरुण मुले-मुली डार्कनेटसारख्या वेबसाईट्सवरून ती सरळ घरी मागवता येतात. जागतिक अमली पदार्थ अहवाल २०१६ नुसार इंटरनेटवर खरेदीचे प्रमाण २००० साली १.२ टक्के होतं. ते २०१४ मध्ये २५.३ टक्के एवढे प्रचंड वाढले. एवढेच नव्हे तर इंटरनेटवर ड्रग्ज रेसिपी डाऊनलोड करून घरच्या घरी 'किचन लॅब' मध्ये बनवणे तर निर्धोक झाले आहे. डार्कनेटसारख्या साइट्सवर आपली ओळख सांगण्याची आवश्यकता नसते. बिटकॉईनमुळे आर्थिक व्यवहारही कुठेही कळून येत नाही. तंत्रज्ञानाचा वापर किती प्रमाणात मारक ठरू शकतो याचा हा उत्तम मासलाच आहे.

**परिणाम काय?**

तंबाखू, दारू व अन्य मादक पदार्थ मानवी शरीरावर व मनावर अतिशय विपरीत परिणाम करतात. एक सिगरेट ओढली तर आयुष्यातील पाच मिनिटे कमी होतात असे संशोधन सांगते. आपल्या देशात तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे वर्षाकाठी १२

लाख लोक मृत्यूला कवटाळतात. म्हणजे रोज सुमारे ३००० लोक तंबाखूमुळे मृत्यू पावतात. तंबाखूत पाच हजार रसायने असून त्यातील ६८ रसायने ही कारसिनोजेनिक म्हणजे कॅन्सरला कारणीभूत ठरणारी आहेत. अमली पदार्थ सेवनांमुळे महाराष्ट्रात होणाऱ्या रोज आत्महत्या हे देशात सर्वात मोठे प्रमाण आहे. एका पाहणीनुसार भारतातील अमली पदार्थ व्यसनांचे प्रमाण अमेरिका, युरोपपेक्षाही जास्त आहे. आज जगभरात अब्जावधी डॉलर्सची उलाढाल होणारे सर्वात मोठे तीन धंदे आहेत ते म्हणजे अमली पदार्थ तस्करी, अश्लील चित्रनिर्मिती आणि स्मार्टफोन.

यातील अमली पदार्थ (ड्रग्ज) आणि अश्लील चित्रनिर्मिती (पोर्न) हे दोन काळे धंदे प्रचंड वेगाने फोफावले इतके की आपल्या आपल्या गावात, आपल्या मोहल्ल्यात नव्हे तर आपल्या घराच्या दाराला आता धडका मारू लागले हे आपल्याला कळायला उसंतच मिळाली नाही. त्यामुळे आज कुणीही मध्यमवर्गीय सुशिक्षित, सुंस्कारित मनुष्य छातीठोकपणे, ''हे माझ्या घरात होणे शक्य नाही'' असे म्हणू शकत नाही. दोन तीन दशकांपूर्वीपर्यंत पालकमंडळी आपल्या पाल्यावर चांगले संस्कार जाणिवेने, निवडून करायचे. पण आता परिस्थिती उलट झाली आहे. स्मार्टफोन, इंटरनेट, पोर्न, ड्रग्ज, पार्टी, गेमिंग, तीन पत्ती - रमी यांसारखे ऑनलाइन जुगाराचे ॲप्स अशा अनेक कुसंस्कारापासून मुलांना वाचवणे हीच पालकांची कसोटी झाली आहे.

**असं का झालं?**

'निषिद्ध ते करणारच' हा पौगंडावस्थेतील, नियम आहे म्हणता येईल. प्रस्थापितांच्या विरुद्ध वागण्यात एक 'थ्रील' मुलांना वाटते. या वयात आपण प्रत्येकाने कमी-जास्त प्रमाणात 'थ्रील' वाटणाऱ्या खात्रीने केलेल्या आहेत हे आठवून पाहा. म्हणजे मोठ्यांनी जे काही नियम म्हणून लादले आहेत त्याविरुद्ध बंड (Rebel) करण्याचंच ते वय असतं. लेक्चर बंक करून सिनेमाला जाणं यापासून ते चोरून सिगरेट ओढण्यापर्यंत बंड त्याकाळी केलं जायचं यातच तरुणाईला आनंद वाटे.

पीअर प्रेशर हे एक कारण आहे. मित्र मंडळींनी सांगितले तसे केले नाही. तर एकटे पडण्याची, टिंगल-टवाळी होण्याची भीती असल्याने पार्टीत सर्वांबरोबर या बीअरची चव तरी घेतली जाते. यातूनच हा तरतरी, गुंगी आणणारा अनुभव आवडतो. पुन्हा हा अनुभव - प्रसंग यांना असे वाटायला लागते. त्यातून पुढे व्यसनाचा प्रवास सुरू होतो.

पालकांना मुलांसाठी गुणवत्तापूर्ण वेळ (Quality time) देता येत नाही. खरे तर आज जागतिकीकरणामुळे प्रत्येकाच्या कामाचे तास वाढलेले आहेत. कामावरून घरी यायचे टाइम त्याच्या हातातच नसते. त्यात दोन्ही पालक नोकरी करत असतील तर आणखी परिस्थिती बिकट होते. घरांसाठी कर्ज-त्याची परतफेड. मग आणखी काम यामुळे घरातील मुलांना पालकांचा सहवास लाभत नाही. बऱ्याचदा कुटुंबात जर मुलांचे आई वडील विभक्त झाले असतील तर त्या मुलांचे रहाणे तर तणावासारखे राहाणे असते. अशा अनेक समस्यांमुळे कुटुंबात सुदृढ, चांगले वातावरण राहावे लागते. त्यामुळे मुलांसाठी जो वेळ द्यावा लागतो तो त्यांच्या वाट्याला मिळत नाही. त्यामुळे मुलांवर एकाकीपणामुळे संवादाच्या अभावामुळे ताण निर्माण होतो. यातूनच व्यसनाची सुरुवात होत असते.

संवाद हा मानवी नात्याला जोडून ठेवण्यासाठी अतिशय आवश्यक घटक असतो. आज घरात पालक असूनही दोघेही मुलांना वेळ देण्याऐवजी मोबाईलवर व्यस्त असताना दिसतात. मुलांशी अभ्यासेतर संवादाच घडत नाही. जे काही बोलणे जाता येता होते ते अभ्यासाविषयीच. त्यातही गर्भित सक्तीच अधिक मुलांना जवळ घेणे. त्यांच्याशी गप्पा - मौज मजा, खेळ, विनोद यामुळे घरातले वातावरण ताजेतवाने, उत्साही व तणावमुक्त होण्यास मदत होते.

नातेसंबंध प्रेमाचे, जिव्हाळ्याचे राहिले नसल्याने मुलांना पाठबळ व्यवस्था (Support System) आता राहिली नाही. पूर्वी घरात आई किंवा वडील रागावले की मूल काका-काकीकडे किंवा आजी-आजोबांच्या आधार मिळवायचे. हे नातेवाईकच घरात नसल्याने त्यांची पाठबळ व्यवस्था काढून घेतली गेली आहे.

**सहज उपलब्धता :** सिगरेट, दारू यांची सहज उपलब्धता हे एक व्यसनांच्या वाढीचे कारण सांगितले जाते. सगळीकडे पानटपऱ्यावर गुटखा, तंबाखू, सिगरेट व दारूच्या दुकानात दारू उपलब्ध असल्याने एकाकी, उदास, खिन्न, दु:खी व तणावाखाली असणाऱ्या मुलांना यातील कुठले ना कुठले व्यसन करण्याचा मोह होण्याचा दाट संभव असतो. सिगरेट व दारूतून पुढे अमली पदार्थाकडे मुलांची धाव जाते. पुणे शहराचं उदाहरण घेतलं तर पुण्याच्या ३२ लाख लोकसंख्येंतील समजा १०,००० मुलांनी नववर्षाच्या स्वागतानिमित्त ३१ डिसेंबरच्या रात्री पहिल्यांदा दारूची चव घेतली असेल तर त्यांनी १५ टक्के म्हणजे १५०० मुले ही पुढच्या आयुष्यात मद्यपी होतात असे संशोधन सांगते. केवळ दारू सहज उपलब्ध असल्यानेच

हे घडले नाही का? हेच जिथे दारूबंदी आहे अशा गुजरातमधील शहरात घडेल का? त्याचे उत्तर नाही असेच द्यावे लागेल. पंजाबचं उदाहरणं घेतलं तर तिथे हेरॉईन, कोकेन, स्मॅकसारखे अमली पदार्थ बंदी असली तरी उपलब्ध होऊ लागले. तरणतरणासारख्या जिल्ह्यात तर औषधाच्या दुकानात काऊंटरवर मिळत होते. परिणामी तेथील ७० टक्के युवक अमली पदार्थांच्या व्यसनाचे बळी ठरलेले आहेत.

**छुपी जाहिरात (Surrogate Advertising) -** बॉलीवूडचे अनेक अभिनेते तंबाखूजन्य पदार्थ व दारूच्या छुप्या जाहिराती करण्यात आघाडीवर आहेत याला काय म्हणावे? अजय देवगण गेली अनेक वर्षे पान मसाल्याची जाहिरात करतो. आता त्याच जाहिरातीत ज्याला सुपरस्टार म्हणतो तो शाहरूख खानही आता सहभागी आहे. ''इसके दाने दाने में केसर है'' म्हणणाराची अजय देवगण काश्मीरमधल्या केशराची जाहिरात करत नसून तो छुप्या पद्धतीने पानमसाल्याची जाहिरात करतो आहे हे आता लहान मूलही ओळखू शकेल. रॉयल स्टॅग ब्रँडच्या दारूच्या जाहिरातीत शाहरूख खान रोज छोट्या पडद्यावर दिसतो आहे. प्रियांका चोप्राची 'रजनीगंधा'ची तर सैफ अली खानची 'पान बहार' या जाहिरातीही छुप्या पद्धतीने तंबाखूजन्य पदार्थांची जाहिरात करतात. हे सगळे चित्रपट तारे-तारका, क्रिकेटवीर तरुणाईचे आयकॉन असतात. त्यामुळे तरुणाई मोठ्या प्रमाणात दारू किंवा पान मसाला वापर करतात व पुढे व्यसनांची शिकार होतात.

गेल्या महिन्यात बिग बी अमिताभ बच्चन यांनी पान मसाला जाहिरात कराराला पूर्णविराम दिला हे एक चांगले उदाहरण म्हणता येईल. उशिरा सुचलेलं शहाणपण म्हणता येईल. बाकीच्यांनीही हा कित्ता गिरवावा यासाठी त्यांच्यावर समाजमाध्यमाद्वारे दबाव आणला पाहिजे. त्यांच्या या जाहिरातीपासून सावध राहिले पाहिजे. तसेच दुसऱ्यांनाही सावध केले पाहिजे. २००७ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने बजावले होते की वलयांकित लोकांच्या ड्रग्ज सेवनाकडे फारसे लक्ष न देणे किंवा त्याबाबत नरमाईचे धोरण हे समाजात ड्रग्ज वापराचा फैलाव होणे व जागतिक अमली पदार्थ व्यापाराला प्रोत्साहन देण्यासारखे आहे. त्यांनी म्हटले आहे. ''सिलेब्रिटींचं ड्रगज सेवन हे जनतेच्या एकंदर दृष्टिकोनावर, मूल्यांवर व वर्तवणुकीवर खूप प्रभाव करणारं विशेषत: तरुणांवर - ज्यांनी ड्रग्जविषयी पुरेशी माहिती व आनुषंगिक भूमिका घेतलेली नसते - अशांवर अधिक प्रभाव करणारं ठरतं.'' नेमके हेच आपल्या देशात आज घडत असल्याचं प्रत्ययाला येत आहे.

**उपाय काय : -** भारत हा युवकांचा देश म्हणून जग भारताकडे मानव डोळे लावून बसले आहे. भारताकडे आता ६३ कोटी युवक आहेत. पण हा सुदृढ युवकांचा देश म्हणता येईल का हा खरा प्रश्न आहे. ही युवाशक्ती सुदृढ ठेवायची असेल तर त्यांच्याशी पालकांचा मनमोकळा संवाद, घरात तणाविरहित वातावरण, मुलांबरोबर अभ्यासेतर गप्पा, पालकांचं निर्व्यसनीपण, इ. बाबींची आवश्यकता आहे. तरच मोबाईल - इंटरनेटवरचं आभासी जगाबाहेर तो येवू शकेल.

मानसिक जवळीकता, प्रेम यापासून तो तुटत चालला आहे. हे पालकांना, कुटुंबीयांना सांधता आलं पाहिजे, याचबरोबर मुलांना स्वातंत्र्य देताना ती स्वैराचार तर करीत नाहीत ना याकडेही कटाक्ष पाहिजे. आज घरात एक किंवा दोन अपत्ये असतात त्यामुळे त्यांच्या कोणत्याही गोष्टीला 'हो' म्हणणं हे जबाबदार पालकत्व म्हणता येईल का याचाही विचार हवा. पालकांनी पालक म्हणून आपली भूमिका बजावणं आवश्यकच आहे.

दुसरी बाब म्हणजे अमली पदार्थाविरुद्धचा एन.डी.पी. एस. कायदा हा कडक आहे. त्याची अंमलबजावणी कठोरपणे झाली पाहिजे. मुलांच्यात व्यसनांच्या दुष्परिणामात बाबत लहानपणीच जाणीव निर्माण करणं अतिशय महत्त्वाचं आहे.

राज्यकर्त्यांना व्यसनांच्या समस्येबद्दल फारसं देणं नसून घेण्याशीच संबंध असल्यानं व्यसनांच्या विरोधात एकही राजकारणी व्यासपीठावरून काही भूमिका घेताना दिसत नाही. व्यसनं करा म्हणून उघड सांगत नाहीत ही एक चांगलीच गोष्ट आहे. राजकारणी व्यक्ती निवडणुकीत महिलावर्गाच्या मतांकडे लक्ष देत दारूबंदीबाजूंनी कधीकधी बोलतात. हेही चांगलेच. पण चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री विजय वडेट्टीवार यांनी दारू दुकानावर, मद्यपी यांना चंद्रपूर जिल्ह्याची असलेली दारूबंदी उठवण्याचं आश्वासन निवडणूक प्रचारात दिलं व निवडून आल्यानंतर ते आश्वासन पूर्णही केलं! त्यांच्या प्रामाणिकपणाला दाद दिलीच पाहिजे! असो. **शेवटी या अमली पदार्थाच्या व एकूणच व्यसनाधीनतेच्या समस्येला प्राधान्यक्रमाने सोडवण्यासाठी शासन, प्रशासन, पोलीस यंत्रणा, समाजसेवी संस्था व सबंध समाज सर्वांनी मिळून ठोस पावले उचलली, तर या समस्येची पाळेमुळे उखडून काढून देश बलशाली बनविता येईल.**

❖❖❖

# निरंजना

## ■ महावीर जोंधळे

*(पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे कार्य आणि विचारसूत्र बौद्ध तत्त्वज्ञानातून आकाराला आले होते. या तिघाही महापुरुषांच्या तत्त्वप्रणालीच्या अभ्यासातून आपल्या लक्षात येते.)*

१
झिरपत झिरपत
खोल खोल
मूळ शोधण्याची
अविरत भाषा
बुद्धाची.
वितळताना
बर्फ पाणी
डोळ्यात किती
घन घन आशा.
काळजात दडलेली
एक, एक विराणी
पापणीवर स्थिर
आपल्या.

२
मनातल्या मनात
ज्याला बर्फ
साठवता येतो
त्याला त्याला
मिळत जाते
निळी निळी
निरंजना.

३
झोपलेलं
झाड
वारा पिऊन
अंगणात
नाचतं
स्वार्थी मुकुटात
एक झाड
हळू हळूच उतरतं
उंच उंच
जाण्यासाठी
आत्ममग्न सावल्यांच्या
उजेड साक्षीनं!

४
उगवतीचा सूर्य
सावलीत विरघळतो
तेव्हा
स्तनपानात रमलेली
लेकरं
शेंड्यावर उतरतात
वृक्षांचे गात्र गात्र
बुद्ध होतात
डहाळी डहाळी

५
आत्मजाणिवांचं झाड
मेंदूत उभं
उभ्या-आडव्या फांद्या
पसरून.
हटवादी असत्याला
हरळीनं झाकीत.
मग
झाडांच्या तळाशी
बुद्धाने लावलेले
अमूर्तातील दिवे
झिडकारण्याचंच
सामर्थ्य देतात
मनात पेटणारा संघर्ष
झिडकारण्याचा

६
बुद्ध,
सांगतो सर्वांना.
झाडाशी बोलून बघा;
छान बोलतं ते.
हळू हळू

खरं खरं
जगणंच सांगतं ते.
सावली म्हणजे
काय असते?
ऊन असतं कसं?
हेच सांगतं झाड
काचलं जरी अंग
तरीही झोका बांधू
देजं झाड.
पान पान
तुमचं करीत

७
वाकलेल्या प्रदीर्घ
पोक्त फांदीला
झाडाच्या बुंध्यालाही
सरणंम गच्छामिचीच
घट्ट साल
आवळून आहे.
बोधीवृक्ष अजूनही
खूप, खूप सच्चे आहे

८
अंग अंग
पाऊस झिंग
देखणीच असते
शांत मुद्रा,
पित समुद्रा.
गुलाबाचा जन्म
काट्यावर होतो, तरीही
त्याला त्याचं खरचटणं
वाटत असतं मुखमलीच.
डहाळी डहाळी बुद्ध;
बुद्ध पांथस्थ होताना

९
जन्म जन्म
अंधार उजेड
यातनांचा खेळ;
खेळावा कसा
शांततेत?
सुखाच्या मुखी
चंद्र नाचतो
चंद्र पाझरतो
झिरमिरी
अंतरिची वात
रेषभर न ढळे
तथागताच्या
मनात!

१०
निसर्गवेलीची
अंधारी सावली
येते कशी अवळ?
आणि दूर दूर कसे
जातात उन्हाचे पदर?

११
संथ संथ भाव समाधी, मऊसूत अंथरून
वृक्षाखाली
सुरेल प्रकाश.
न संपणारी ती पाऊलवाट.
निर्मय
ध्वनी,
ध्वनी नभात.
ओघवतात, अर्थवाही
रंगमनाचा गडद दाट

१२
कधी कधी फुलपाखरू, कधी चिमणीची पावलं
त्यांचंपण बुद्धाच्या तळहातावर घर
शब्द कोरडा कधी येत नाही
पाखरं तळहात कधी म्हणून सोडत नाहीत.

१३
बुद्ध
श्वासाचा
खळाळता अर्थ
विवंचनेतच
सांगे कसा आणि
किती
जीवनार्थ ०

१४
पायवाट आणि काटे
ते ओळखताना
आकाश कवेत होते.
जरी राजवस्त्रही
झाले निर्वासित.
तो क्षण, काळ
गळून पडला राजमुकुट
राज वाहणांच्या
झाल्या खडावा तरी
तू अचल, शांत
तू हंस, तू कबूतर
केले मोहाला निरुत्तर
सदा सर्कस.


१५
बहिष्कृत, अछूत विचार असुंदर
सारासार माणूस मनात
मग मंथन
वज्राहून वज्र असुंदराचे
नष्ट कराया कामी तुझे बळ

१६
क्रोध क्रोध देह
तिथं नसे बुद्ध
पद्म पद्म चंद्र
तिथे भेटे बुद्ध

१७
त्या तेजोमय सळसळीत
बुद्ध मला छळतो आहे.
तोही शांत, मीही शांत
प्रसन्न मनात
मीच मला कळतो आहे.
अभ्र अभ्र मनात बुद्ध
मी नि:शब्द.

१८
आकाश भरून ढग मौनाचे, ढग आगमाचे
घेत भरभरून झोळीत.
झोळीत घेत भरून
पाणी झुळझुळते
आणि माती महान.
तृण नारंगी, एक होत, तनमनात.

१९
ही अनावर ग्लानी कशाची
पावसाळी थेंबांची की,
उन्हात तापल्या कणांची?
कोण वाजवी कोणासाठी
पानसंबळ उद्याची?
कळून चुकले तुला
त्याचे उत्तर तेव्हा
तू टाकले सिद्धसडे भूमीवर
उजडताना सूर्य, नवे.



❖❖❖

# 'एक बाई लढू पहाते आकाशाशी भिडू पहाते'

■ **लेखिका : छाया कोरेगावकर**

**छाया कोरेगावकर यांची ठाणे येथे डिसेंबर मध्ये होणाऱ्या अठराव्या कॉम्रेड अण्णा भाऊ साठे विचार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी एकमताने निवड झाली आहे.**

**छाया ताईंचे अन्नपूर्णा परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन**

**—संपादक मंडळ**

बदलापूरहून टू व्हीलरवर मी आणि संजीवनी नांगरे वांगणीला निघालो. बरंच अंतर कापून गेल्यावर बौद्धवाड्यात पोहचलो. एका बऱ्यापैकी पक्क्या घरासमोर गाडी पार्क करता करता संजीवनीने आवाज दिला 'शमाताई आहेत का घरात?'

तिचा आवाज ऐकताच एक प्रशस्त व्यक्तिमत्त्वाची बाई दारात आली. व्यक्तिमत्त्वाप्रमाणेच दमदार आवाजात तिने 'जय भीम' ची आरोळी दिली.

कश्या आल्या वो संजीवनी मॅडम? भारदस्त व्यक्तिमत्वाच्या शमाने तितक्याच प्रसन्न मुद्रेनं आमच्या दोघींचं स्वागत केलं. हसताना तिच्या गोल-गरगरीत गालावर चांगल्या हरभऱ्याएवढ्या दोन खळ्या उमटल्या होत्या. शमाचं व्यक्तिमत्त्व मला एखाद्या पूर्ण उमललेल्या सूर्यफुलासारखं वाटलं. मला पाहून तिने संजीवनीला विचारला पावण्या कोन हायेत?

आपल्याच आहेत. कार्यकर्ता छायाताई !

आपल्याच हायेत ना मंग घ्या जय भीम ! असं म्हणत तिच्या दणकट हातात माझा हात घेऊन पुन्हा एकदा जय भीम घातला. आंबेडकरी समूहात 'जय भीम' हा परवलीचा शब्द एखाद्या मंत्रासारखा निष्ठेने आणि अभिमानाने उच्चारला जातो याचा मला वारंवार प्रत्यय येत होता.

ऑक्टोबरची टळटळीत दुपार ! घामाने अंगाची काहिली झालेली. दुपारचे दीड-दोन वाजलेले. पण बहुजन समाजात चहाशिवाय पाहुण्यांचं अगत्य पूर्ण होत नाही. घरात दोन तरुण मुली वावरत होत्या. एकीने दहा मिनिटांच्या आतच घट्ट दाट चहाचे कप समोर ठेवले.

'काय मॅडम मीटिंग विटिंग बोलवायची हाय काय ? बोलवू का वस्तीतल्या बायांना ?'

'मीटिंगचं करायची आहे पण फक्त तुझ्याबरोबर!'

संजीवनीच्या उत्तरादाखल शमाने गोंधळून विचारलं!

माज्या बरुबर कसली मीटिंग? मी काय पुढारी हाय तवा ?

तुम्ही संघटनेतल्या बाया पुढाऱ्यांपेक्षाही भारी आहात! तुझ्या आयुष्याची कहाणी समजून घ्यायची आहे आम्हाला ! ह्या छायाताई ती लिहून काढणार आहेत.

यावर गडगडाटी हास्य करत दोन्ही हात जोडून डोक्याच्यावर नेत शमा म्हणाली,

'माज्या जिंदगीची तर लयीच कॉमेडी झाली मॅडम !' 'जिंदगीची कॉमेडी?' आयुष्याचा इतक्या सहज आणि सकारात्मक स्वीकार करणाऱ्या शमाच्या जगण्याची वाटचाल समजून घेण्याची मला आता उत्सुकता वाटू लागली. मी तिचा हात हातात घेत म्हणाले, शमा मोकळेपणाने बोल. एका मैत्रिणीकडे जीवाभावाचं बोलशील तसं बोल. माझ्या बोलण्याने ती रिलॅक्स झाली. शमा जशी अंगापिंडाने मोठी तशीच मनाने पण मोठी ! म्हणाली जेवणाची येळ हाये जेवून घेऊ ! मधल्या वेळात धाकटीने चपळाने बाजारात जाऊन बांगडे आणले. गरम-गरम वरण भात, उसळ, चपात्या आणि खरपूस तळलेले बांगडे!. जेवणावर ताव मारून झाल्यावर शमा सरसावून बसली.

आता तुम्हाला पयल्यापासून स्टोरी सांगतो.

माजा म्हायेरचा नाव शमा गायकवाड, आन सासरचा सुमिता सोनावणे. आम्ही सात भैनी. मोठी सावतर आईची. पण तिचा लगीन होऊन तिला नवऱ्याने सोडलीला. मंग ती बी आमच्या संगट. बाप मजुरी करायचा ना आई मोटी भैन उल्हासनगरला धुन्या-भांड्याची

कामं कराला जायची. पण चुलता वारला मग आय तिच्या आयबापाला एकलीच. मंग आज्जी बी आमच्याकडं ! घरात एवढी मानसा ना कमावणारी दोघंच जना. मंग काकी, आजी, भैनी सगळ्याच धुन्या-भांड्याची कामं करायच्या. मोठ्या भैनीला नवऱ्याने टाकलेली. मंग आमच्या बापानं त्याच्यावर पोटगीचा दावा लावला. ती केस पुन्यात चालायची. बापाची कमाई सगळी कोर्ट-कज्यात जायची. घरात लय

वडा-तान. खानारी एवढी तोंडा ! मंग बापानं पटापट एकेकीचा लगीन लावला.

माज्या बापाला राजकारनाचा चस्का ! त्यामुल मोठी-मोठी मानसा घरी यायची. असाच एकदा बी. सी. कांबळेच्या धाकट्या भावाची म्हणजे अशोक कांबळ्यांची मीटिंग वांगणी गावात लागलेली. मोप माणसा जमल्याली. त्यातली दोन माणसा आमच्या घरी आली ना आईला म्हणाली

शमीचं लगीन करायचा ना वर्षी ? पोरगा आलाय बगायला ! आणू काय ? तं आई म्हनाली आना बाबा ! पंचवीस वर्साच्या आधी वांगणीत लाइट नव्हता. रात्रीचं आठ वाजल्याला. नवरा मुलगा घरात येऊन खुर्चीवर बसला. मी अंगणात मैतरणीबरुबर काचा-पानी खेळत होतो. मला तशीच घरात आनली. अंधारात रॉकेलच्या बत्तीत मिनी काय नवरा नीट बघितला नाय. आन मी बी स्कर्ट-ब्लाउजवर ! तशीच दाखवली पोरगी. नवऱ्याला इचारलं पोरगी पसंद हाये काय? तो आनंदाने हा म्हणाला. मला कुणी इचारलाच नाय तुला नवरा पसंद हाय काय म्हणून ! मी नवरा बगला न परत गेलो मैतरणींच्यात खेलाला.

घरातनं भायेर पडताना आईनं बघितला का नवरा एका पायानं लंगडा हाये. आयनं लई बडबड केली बापाकडं. पण बाप म्हणाला पोरगा नोकरदार हाये. घर बी चांगला आहे पनवेलला. बंगलाच हाये त्यांचा ! आपली पोर सुखात राहील ना ! '

'मी पन पक्की खूश ना !' मी मैतरणीला सांगायचो माज्या नवऱ्याचा मोठा बंगला हाये, तांब्या-पितळेच्या भांड्यानं घर भरलेला हाये. आनी नवऱ्याला चांगला पगार बी हाये !

'म्हणजे तू खूश होतीस तर ! पण तुला शिकावंसं वाटलं नाही पुढं?'

हा मी सातवीत होतो. शिकायचा होता. पण माजा बापूस लय कडक ! त्याच्यापुढं जायची काय हिंमत नव्हती.

पुढं तर लईच कॉमेडी झाली.

लग्नाला वऱ्हाड आलं. पुरा वऱ्हाड पिऊन टाईट. नवरा मुलगा तर लयच टाईट ! तो खुर्चीवर बसल्याला ! त्याला उठून भवल्यावर उभा राहिला येईना ! कसातरी त्याच्या दोन भैनींनी बावट्याला धरून भवल्यावर उभा केला. नवरदेव लटापटा कापत हुता. नवरीच्या गळ्यात हार घालायला जावा तर त्याचा झोक जाई ! कसातरी माज्या गळ्यान हार घातला ना पुन्हा खुर्चीत जाऊन बसला. फुल तराट. वऱ्हाडान जेवनाचा पार सत्यानास केला.

कुणाचा ताटात पाय तर कुणाचा हात जाई. कसातरी जेवान उरकून वऱ्हाड ट्रकात बसून पनवेलला निघाला. डायव्हरच्या बरुबर मी न माजा नवरा न मांग सारा वऱ्हाड. ट्रक वांगणीच्या बाहेर पडला ना नवरदेवानं खिशातनं चपटी बाटली काढली भायेर. मी त्याच्या बाजूला बसल्यालो. बाटली तोंडापुढं धरून मला म्हणं पिती काय थोडीशी? मी तर हाडबडून गेलो. हा असला कसला नवरा ? अजून वळख बी झाली नाय तवर नवरीला दारू पाजाय लागला.

गावात वऱ्हाड पोचला तर बेंजोवाले गायब. नवरा नवरीला येशीच्या आत घेईनात. मंग बाशिंगासकट नवरदेव बेंजोवाल्यांच्या मांग ! इकडं वऱ्हाड खोळंबलेला, ना नवरदेव तिकडं बेंजोवाल्यासोबत बाशिंगासकट दारू पित बसलेला. तर असा पक्का बेवडा नवरा माज्या पदरात टाकला माज्या बापानं. बरं घर-दार चांगला म्हनावा तं घर कसला? एक कुडाचा झोपडा! त्याला हातभर फटी! शेणामातीनं बी सारवलेलं नाय. मी घरात तांब्या-पितलेची भांडी सोधतो तं काय नुस्ता गाडग्या-मडक्याचा बाजार ! वलीन दोरीनं टांगलेल्या दारूच्या बाटल्या! त्यातच तेल-मीठ-धान्य भरलेला. तर अश्या दुबल्या संसाराची राणी झालो मी !

शमा जरी आयुष्याची कॉमेडी सांगत होती पण तिचे मोठे मोठे टपोरे डोळे भरून आले होते.

याची नाटकं बघून आई-बापानं हाकलून दिला पनवेलमधून. मंग रसायनीला त्याच्या कंपनीजवल घर घेतला भाड्याचा. पण हा तिथं बी धड नाय. कामावर जायचा नाय. दांड्या मारायचा. मंग घर कसा चालायचा. मंग मीच कामा सोधली. रोडवरची कामं, गार्डनिंगची कामं एवढाच काय रसायनीच्या कंपाऊंडमधला भंगार येचून संसार चालवला. हा एका घरात टिकायचा नाय. रसायनीत सात घरा बदलली. आशी तेरा वर्ष काढली बेवड्याबरुबर !

'मग मुलं-बाळ नाही झाली तेरा वर्षांत ?'

'मरणाची दारू प्यायचा ना हा ! बायकोजवल झोपाला सुद्धीत तर पायजेल गडी ! मंग कसली पोराबाळा?'

मंग पिऊन पिऊन याच्या गल्याची नली चोकप झाली. मंग इकडं वांगणीला म्हायेरी येऊन त्याला बरा केला. महिनाभर हॉस्पिटलात बी धिंगाना घालाचा.

इकडं भैनीच्या घरात ऱ्हायलो. मंग तीन पोरा झाली आता. हा वांगणीवरनं रसायनीला कवा जायचा कामाला? मंग मिनी उल्हासनगरला धुन्या-भांड्याची काम पकडली. सकाळी सात वाजता घर सोडाच तो संध्याकाळी पाच वाजता यायचो. वरची बी कामा कराचो. अशी घरकामा करून करून तीन पोरांची शिक्षणा केली. तिघांना १४-१५ वी पर्यंत शिकवलं. भिशी लावून लावून तीस हजार जमा केले. बापानं वाटून दिल्याल जाग्यात हलूहलू करून ह्यो घर बांधला. घर बांधायला कामवाल्या बायांनी पण वेलेला उचल दिली. मॅडम या

घराच्या एकेका इटेत माज्या रक्ताचा पानी हाये. दुःखाचा पाढा वाचता वाचता शमाचा कंठ दाटून आला. हलकेच मी तिचा हात दाबत म्हणाले,' एवढी धडपड करून इथवर आलीय ना ! जिंकलीस तू !'

खरी जीत तर पुढचं हाये !

म्हणजे !

दारू पिऊन पिऊन माज्या नवऱ्याचा पोट 'ह्या' नगाऱ्यावानी फुगाचा. तो घरातच हागाचा ना मुताचा. येवढे येवढे गुवाचे पव मी हातात ग्लोज घालून साफ कराची. अशी लय दिवस घान काढली त्याची. पण शेवटी नाय जगला. २००९ मधी मेला तो ! पण मरेपर्यंत त्याची सेवा केली मिनी !

शमा एक विचारू? लग्नात आपली फसवणूक झाली. अपंग तर अपंग पण असा व्यसनी नवरा ज्याने काडीचं सुख दिलं नाही त्याला सोडायचा विचार नाही आला तुझ्या मनात?

असा इचार करून काय झाला असता ? बापाच्या इज्जतीला बट्टा लागला असता. काय बी झाला तर नवराच हाये तो ! त्याच्या नावानं कुकू लावला. कुकवाबिगर लोकांच्यात बाईला इज्जत नाय मिलत मॅडम !

बाप रे केवढी ही सामाजिक दहशत ! या दहशतीच्या आगीत शमासारख्या किती जणींची आयुष्य होरपळून निघाली असतील. खूपच सेवा केलीस तू नवऱ्याची !'

सेवा करून बी शिव्याच भेटायच्या ! मरस्तवर त्याने रंडीशिवाय हाक नाय मारली मला ! गेला तं गेला ना जाताना करामती करून गेला !'

करामती म्हणजे ? काय केलं होतं त्याने ? मी विचारलं

सांगतो. समदा. नवरा मेला तं तिसऱ्या दिवशी मी गेलो ग्रामपंचायतीत नोंद कराला तं मला कलला का दिर बी येऊन गेला मृत्यूचा दाखला न्यायला. मला समज नाय ह्याला कशाले पायजेल दाखला? पनवेलमंदी आमची २८ गुंठा जमीन सासू-सासऱ्यांची. त्या जागेवर दिराने घर काढला बांधायला. मी ओब्जेक्शन घेतला. तो म्हणे तुझ्या नवऱ्याने हक्क सोडपत्र देऊन जमीन माझ्या नावावर केली. ह्या ऐकला ना माज्या डोक्यात दगडच बसला.

मग मी तालुका पोलीस-स्टेशनला गेलो ना कंप्लेन्ट दिली. पोलिसाने मला तलाठ्याकडे पाठवला. तलाठी लय चांगला माणूस होतं. त्याने मजा सगला म्हनना ऐकला. ना इथून पुढं संघर्षाला सुरवात झाली. एक तक्रार अर्ज प्रांतला हापिसला, दुसरा तहसीलदाराला, तिसरा शासनाला दिलं. पन तितं सगला ग्रामपंचायतीचा कारभार माजी डाल शिजली नाय. मंग तलाठ्याच्या सांगण्यावरून सिविल कोर्टात केस टाकली.

कोर्टात केस टाकली न काय सांगू माजी परवड. मी वांगणीची वकीलबाई केली. सारंग तिचा नाव. तिनी मला लय सपोर्ट केला. दर तारखेला मी वांगणीवरून पनवेल कोर्टात जायचो. पोटात आन नाय ना पानी. ११ वाजता कोर्ट खोलायचं. मी ११ ते ५ वाजेपर्यंत कोर्टात बसून राहायचो. नाव पुकारतील म्हणून चाय प्यायला बी नाय जायचो.

मग हे सगळं तू एकटीनेच करायची?

मंग काय ? काय-काय तारखेला वकील बाय संगतीला यायच्या. बाकी कोन गडी मानूस नाय का भाव भावजय नाय.

मॅडम अशी ९ वर्सा मिनी वांगणीवरून पनवेल कोर्टाच्या खेटा घातल्या. जिद्दीने उभा ऱ्हायलो मागं हटलो नाय ! दिराचं मोठं मोठं वकील. पैसेवालं. माज्या वकीलबाईला तं मी फी बी द्यायचो नाय. ती पन अशा मोट्या मनाची, की म्हणायची तुझी जागा ताब्यात येईल तेव्हा ते काय द्यायचं ते दे ! घरची माणसा उलाटली पन भायेरची पाटीमांग उभी राहिली. वकिलीन बाईचं लय उपकार हायेत माज्यावर ! दिराचा वकील मला लालूच दाखवायचा लाख रुपये आणि केस मिटव कारण तुझ्या नवऱ्याने हक्कसोड पत्र दिलंय. आता त्याच्यात बदल होणार नाय ! पन मी बधलो नाय. जिद्दीने संघर्ष चालू ठेवला. याला भेट, त्याला भेट, ह्यो कागद आन, त्यो कागद आन. डोका नुस्ता भंजालून जायचा. पन मी हिंमत नाय हरलो.

आपण बाबासायबांची लेकरं हौत. जिद्दीने संघर्ष करायचा. आपल्या मोठ्या बापाचा म्हनना खरा करून दाखवायचा ! न काय सांगू तो दिवस मॅडम ! निकाल माज्या बाजूनं लागला ना मी कोर्टातच जजबायच्या गळ्यात पडून मोठामोठ्याने रडाय लागलो. जजबाई जवान बॉबकटवाली पोरगीच होती. ती पन खुश झाली. ती मला नेहमी धीर द्यायची. 'सोनावणे बाई, आपण ही केस जिंकणार ! जमीन तुमच्या नावावर होणार ! मी माझी सगळी ताकद पणाला लावणार !' सारंगबाईचे शब्द खरे झाले. 'मॅडम तो माज्यासाठी सोन्याचा दिवस होता ! घ्या, घ्या लीवून घ्या ! तीन बायांनी ९ वर्सा संघर्ष करून कोर्टाची केस जिंकली.

क्षणभर शमाची संघर्षगाथा ऐकताना माझ्या अंगावर शहारा आला. एका अनामिक दुःखानंदमिश्रित भावनेने माझा गळा दाटून आला. शमासारखी ७ वी शिकलेली बाई स्त्रियांच्याच मदतीने ९ वर्षे संघर्ष करून एक न्यायालयीन खटला लढविण्यात यशस्वी होते. ही खचितच सामान्य बाब नाही. उठता-बसता बाबासाहेबांचं नाव घेणाऱ्या नेते आणि कार्यकर्त्यांपेक्षा बाबासाहेबांचं जीवनसूत्र कृतिशीलपणे अमलात आणणारी शमासारखी साधी बाई मला बाबासाहेबांची खरी अनुयायी वाटली. त्याच वेळी ज्या हिंदू-कोडबिलाच्या माध्यमातून इथली जमीन स्त्रीच्या अस्तित्वासाठी भक्कम करून ठेवणाऱ्या बाबासाहेबांच्या आठवणीने माझा कंठ दाटून आला. सद्‌गतीत कंठाने मनातल्या मनात एकीकडे शमाला आणि दुसरीकडे बाबासाहेबांना सॅल्यूट करत मी शमाच्या घरातून बाहेर पडले.

❖❖❖

# पिंडदानेश्वर

■ **उषा परब**

**सावंतवाडी, मो. ९४२३८१८८२८**

एक दिवस ओमी चक्क कावळा घेऊन आला घरात.

खरं म्हणजे पिंजऱ्यात आता पक्षी, छोटे प्राणी हौस म्हणून घरात पाळायचे नाहीत हे तर आमचं आधीच ठरलं होतं. जेव्हा सापाने पिंजऱ्यांतील खारीची पिल्ले चक्क घरात शिरून गिळंकृत केली होती. तरीसुद्धा ओमी पुन्हा का हे नसते उपद्व्याप करतो आहे!

मी थोड्याशा आश्चर्यानेच डोळे वटारून पाहिलं ओमीकडे, तर तो शांतपणे म्हणाला, ''घाबरू नकोस. सोडून देणार आहे मी त्याला. तो बरा झाल्यावर.''

त्याने कावळा समोर धरला माझ्या. त्याच्या दोन्ही पायांना एक नायलॉनचा धागा अडकला होता आणि त्या उलट्यासुलट्या गुंडाळलेल्या धाग्यात त्याचे दोन्ही पाय करकचून बांधून ठेवल्यासारखे अडकून पडले होते.

त्याने पाय सोडवण्याचा किंवा उडण्याचा प्रयत्न केला असेल तेव्हा तो धागा त्याच्या मांसल भागात जास्तच रूतत गेला असेल. त्याने पुन्हा पुन्हा केलेल्या प्रयत्नात तो अधिकच गुरफटत गेला असेल. बिच्चारा कावळा!

पायांना जखमा झाल्या होत्या त्याच्या त्यातून रक्त येत होतं. सूज आली होती. त्याच्या पायांना आणि तो धागा अधिकच गच्च घुसून बसला होता त्याच्या रक्तमांसात.

ओमी म्हणाला, दिवसभर हा कावळा उडण्याचा प्रयत्न करत होता आणि खाली पडत होता. त्याला ना उडता येत होतं ना बसता येत होतं. ना खाणं ना पिणं. घायाळ होऊन पडला होता. तडफडत होता. मातीत कालपासून. मेलाच असता आज ना उद्या. दोरा त्याच्या पायात इतका अडकून पडला आहे ना उलटा सुलटा, की तो त्यातून स्वत:ला सोडवूच शकणार नाही. म्हणून घेऊन आलो मी. बघू त्याला वाचवता येतं का. प्रयत्न करूया.

कावळा अगदी मरणासन्न होता. त्याला ओरडताही येत नव्हतं. त्याच्या घश्यांतून केविलवाणा आवाज येत होता कसातरीच विचित्र.

ओमी म्हणाला कैची घेऊन ये जा त्याचे पाय मोकळे करता येतात का बघू. त्याच्या पायात अडकलेला धागा काढायला हवा. तरच तो वाचू शकेल. ओमीची कळकळ अगदी काळजातून होती.

मी कैची घेऊन धावले. ओमीने कावळ्याचे जायबंदी पाय माझ्या समोर धरले...

बापरे! कावळ्याचे ते रक्ताळलेले पाय पाहून थरथरायलाच लागले मी. धागा कापायचा तरी कसा. धागा तर त्याच्या पायात घट्टपणे घुसलाच होता. हलक्या हाताने एकेक फेरा चिमटीत पकडून मांसातून बाहेर खेचत कापून काढायला हवा होता. असं करताना कावळ्याला वेदना होत असल्याचं जाणवत होतं. त्याचे पाय अधिकच रक्ताळले. जखमा चिघळल्यात.

पंधरा–वीस मिनिटांच्या अथक धडपडीनंतर कावळ्याचे पाय धाग्यातून मोकळे झालेत. पण रक्ताळलेल्या, चिघळलेल्या जखमांचं काय? त्या कशा बऱ्या होतील? थोडा वेळ लागणारच होता त्यासाठी.

पण म्हणजे तोपर्यंत कावळा तर जिवंत राहायला हवा होता. त्याच्यावर उपचार करताना कावळ्याला पिंजऱ्यात आडवा ठेवला. तो मान टाकून निपचित पडून होता. जिवंत होईल की मरेल काहीच सांगता येत नव्हतं.

दिवसभर कावळा तसाच पडून होता. पाणी पीत नव्हता, काही खात नव्हता. हालचालही करत नव्हता. मेला की जिवंत आहे अशी शंका येत होती. आम्हाला सतत.

आम्ही अधूनमधून तो जिवंत आहे का, याची खात्री करून घेत होतो. बोटाने ढोसलं की थोडी हालचाल करायचा. तेवढीच तो जिवंत असल्याची खूण. की बाबा आहे! कुडीत अजून प्राण आहे!

ओमीने त्याच्या पायाच्या जखमा साफ करणं, मलम लावणं सुरूचं ठेवलं. दुसऱ्या दिवशी कावळ्याची हालचाल दिसू लागली. आम्ही त्याची चोच बळेबळेच पाण्यात बुडवली तर त्याने थोडं पाणी पिलं. समोर टाकलेले दाणे ही हळूहळू टिपू लागला. आम्हाला धीर आला. हळूहळू तो पंखांची हालचाल करू लागला.

दोन-तीन दिवसाने कावळा चक्क उठून बसला. खाऊपिऊ लागला. कावळा ओरडूही लागला होता. पिंजऱ्याबाहेर पडू पहात होता. पंख पसरून उडू पाहत होता. तरीही आम्ही त्याला आग्रहाच्या पाहुण्यासारखा अजून दोन दिवस ठेवून वगैरे घेतलं. दाणापाणी केलं.

कावळ्याला जीवदान मिळालं याची खात्री झाली आम्हांला. केलेल्या प्रयत्नांना यश आलेलं दिसत होतं. कावळा बरा होऊन बाहेर पळायला धडपडू लागला तसं ओमीने त्याला पिंजऱ्यातून बाहेर काढलं. अंगणात उभा राहिला आणि कावळ्याला मोकळं सोडून दिलं. निरोप पोचवणारं कबुतर वरच्यावर सोडून द्यावं तसं. कावळा भुर्रकन उडून गेला. समोरच्या झाडाच्या फांदीवर बसला.

मी उडून जाणाऱ्या कावळ्याकडे आनंदाने पाहणाऱ्या ओमीच्या पाठीवर थोपटत म्हणाले ''छान! एका कावळ्याचा जीव वाचवलासच तू शेवटी.''

ओमी माझ्याकडे पाहात हसत म्हणाला, आपण दोघांनी वाचवलं त्याला.

मला उगीचच भरून आल्यासारखं वाटलं. ओमीला घट्ट घट्ट पोटाशी धरून त्याची पप्पी घ्यावीशी वाटली. कुणा एका पंडिताकडून ऐकलं होतं. माणूस मेला की त्याचा आत्मा कावळ्यात शिरतो. म्हणून पिंडाला कावळा शिवला की माणसाचा आत्मा तृप्त होतो. आत्म्याला शांती वगैरे मिळते.

त्यामुळे पिंडाला कावळा शिवला की, नातेवाईक बिनधास्त होतात. की बुवा आपल्या प्रिय व्यक्तीच्या आत्म्याला शांती मिळाली. त्यांना समाधान मिळतं. म्हणजे पिंडदानात कावळा अगदी हिरोच ठरतो. की!

ह्यातलं खरं-खोटं कावळ्याला, आत्म्याला, आणि देव असला तर देवाला आणि त्या पिंडाला माहीत. पण इतकं मात्र नक्की अलीकडे इतर पशू-पक्ष्यांप्रमाणे कावळ्याचीही प्रजाती नष्ट होताना दिसते आहे. तेव्हा पंडित किंवा नातेवाईकांची क्रियाकर्माच्या वेळी गोची होत असते. म्हणजे काय की पिंडाला शिवायला कावळाचा उपलब्ध नसतो. आत्म्याची शांती व्हायची कशी! आणि मग अतृप्त आत्म्याने छळवाद मांडला तर? पंचाईतच की!

कावळा अन् पिंड संदर्भातन चर्चा चालली असताना माझ्या मनात एक मजेशीर विचार आला. की पोपट पिंजऱ्यात पाळतात. त्याला शिकवतात तो शिकतो. सांगू तसं करतो. सांगू तसं बोलतो. तसं कावळ्याला का पाळत नाहीत?

म्हणजे बघा, माणूस मेलं ते गेलं. पण इतरांच्या वेळेची, भूक तहानेची काही किंमत आहे का नाही! कावळा शिवला नाही पिंडाला तर किती वेळ मेलं ते तळमळत राहावं उपाशी. तर माझ्या म्हणण्याचा मतिमार्थ हाच की, पोपटाला पिंजऱ्यात पाळून योग्य ते प्रशिक्षण देऊन आपण त्याच्याकडून भविष्य वगैरे वदवून घेतोच का नाही. तसं समजा कावळ्याला पिंजऱ्यात पाळून त्याला योग्य ते प्रशिक्षण दिलं, म्हणजे अगदी पश्चिम दिशेचाच पिंड नेमकेपणाने उचलायचे वगैरे. तर?

इथे इथे, हा हा, असा प्रशिक्षित कावळा आहे. इथे सोईसाठी कावळ्याचे नाव वगैरे ठेवायला हरकत नाही. जसं की आत्मनंद किंवा शांतीराम किंवा पिंडदानेश्वर किंवा... असंच काही. सुबोध सुचक वगैरे.

तर... जाहिरात वगैरे करावी...

आमचे कडे पिंडदानासाठी भाडेतत्त्वावर चोवीस तास कावळा उपलब्ध आहे. आपल्या वेळेची व ताटकळणीची योग्य बचत हेच आमचे अंतिम समाधान होय.

सेवाशुल्क एका पिंडदानासाठी रु. अमुक अमुक.

गरजूंनी त्वरित संपर्क साधावा. वगैरे वगैरे.

म्हणजे बघा एका दगडात किती पक्षी मरताहेत!

एक - कावळ्याला आश्रय मिळतो, त्याचे संवर्धन होते.

दोन - मालकाला आमदानी मिळते. आजकाल रोजगार तरी कुठे मिळतोय.

तीन - आत्म्याला शांती मिळते. त्यामुळे प्रेतात्म्याची भीती नाही.

चार - आप्तेष्टांना क्रियाक्रर्माच्या वेळी समाधान व सुलभता लाभते.

इतुकेनी सारे लाभ एका शिक्षित कावळ्या कारणे!

माझ्या कल्पनेचं हसूच आलं मला. मी गमतीनं हे नवऱ्याला म्हणाले, तर तो चोमडेपणाने म्हणाला, ''तुम्ही मायलेकच का नाही हा बिझनेस करत कावळा पाळण्याचा आनंद मिळेल तुम्हाला. शिवाय समाजसेवाही घडेल. शिवाय चारपैसे मिळतील त्यातून.'' आणि कधी नाही तो खदखदून हसला. आपल्याच विनोदावर.

मी नाक उडवत म्हणाले, आम्ही एक कावळा वाचवला हे काय कमी आहे. तो शिवेलच ना आता काही जणांच्या पिंडाला. अगदी तुझ्या किंवा माझ्याही. आपण मेल्यावर ओमीला मग टेन्शन नाही. कसं?

यावर तो म्हणाला 'अरे वा! आयतीच सोय करून ठेवलीत की तुम्ही. आता चक्क आपण दोघे मरायला मोकळं.' यावर हसूनच दिलं मी. आता ते त्याच्या विनोदावर होतं की कावळा वाचवल्याचं होतं. कुणास ठाऊक.

कधी कधी होतं ना असं, की बुवा नेमकं कशासाठी काय झालं हे ठरवताच येत नाही आपल्याला! म्हणजे असं बघा की एखादा माणूस रडतो, तर तो नेमका का रडतो? त्याला वाईट वाटलं म्हणून? दु:ख झालं म्हणून? संताप अनावर आला म्हणून? काही दुखतंय खुपतंय म्हणून? की खूपच्या खूप आनंद झाला म्हणून रडतोय?

किंवा एखादा माणूस हसतोय तर तो कसा हसतोय? विनोद झाला म्हणून? आनंद झाला म्हणून? गंमत वाटली म्हणून? गुदगुदी झाली म्हणून? का आतल्या आत रडू येतय म्हणून हसतोय!

नुसतं रडू किंवा हसू किंवा यासारखं काही पाहून त्यामागचा नेमका कार्यकारणभाव नाहीच ना ठरवता येत! तर असो!

अखेर आमचा पिंडदानेश्वर वाचला. हेही नसे थोडके.

❖❖❖

## 'ती असे पुष्प आनंदाचे,ती असे पूर्णत्व तुझे'...

■ कु.वैष्णवी गणेश साबळे, औरंगाबाद

मो. न.८०८०२३९५३३

'ती करते विचार सर्वांचा
ती करते संसार सुखाचा,
ती जपते संस्कार क्षणोक्षणी
ती असे यशस्वी मार्ग यशाचा'...

घरातील प्रत्येकाचा विचार करते ती,घरात प्रत्येकाची मर्जी सांभाळते ती,पतीच्या शब्दाबाहेर जात नाही ती,सासू सासऱ्यांची प्रत्येक आज्ञा ऐकते ती,मुलांना योग्य संस्कार लावते ती, ती दुसरी कोणी नसते तर ती एक स्त्री असते.

एवढं करत असतानाही राजकारण,अर्थकारण, समाजकारण इत्यादी क्षेत्रामध्ये स्त्री समर्थपणे जबाबदाऱ्या पेलताना दिसते.आजची स्त्री ही गृहिणी असली तरी बहुश्रुत आहे.चराचराला स्पर्शून जाणाऱ्या तिच्या या कर्तृत्वाकडे हा समाज आजही पाठ फिरवताना दिसतो.आजही कित्येक हॉस्पिटलमध्ये कित्येक कळ्या रोज खुडल्या जातात.तेव्हा गर्दीत माणसाच्या आज पुन्हा नव्याने माणूस शोधते मी..

जीवनाच्या वाटेवर जीव सृष्टीमध्ये नवनिर्मित करण्याची क्षमता स्त्री पुरुषांच्या एकरूपतेमध्ये स्त्रीलाच बहाल केलेली आहे.तरीही आज स्त्री पुरुषांमध्ये भेदभाव केला जातो.

स्वतःच्या संसारापुढे, कुटुंबापुढे ती स्वतः च्या असण्याचा आणि दिसण्याचा कसलाच आणि कधीच विचार करत नाही.तिला जर कधी एक साडी जरी घ्यायची असेल ना तरी ती त्यास एकदा विचारते.की अहो, मी ही साडी घेऊ का? पण तो कधीही तिची साधी स्तुती ही करणार नाही किंवा कधी तिच्या जेवणाची ही स्तुती करणार नाही. आणि तिच्या मुक्त विचारांना समाज कधीच मोकळी वाट देत नसतो.सगळीकडे असतात तर ती फक्त बंधने...

उत्तुंग यश शिखरावर अश्वारूढ झालेल्या या पुरुषाच्या जीवनात त्याची प्रेरणा एक स्त्री आहे.पण हे जगासमोर सांगण्यास त्यास कमीपणा वाटतो, असे का?

स्त्री ही पुरुषाची प्रतिस्पर्धी थोडी ना आहे ती तर त्याचे अस्तित्व आहे,त्याचे पूर्णत्व आहे. मग ती जर त्याची प्रेरणा असेल,त्याच्या ध्येयपूर्तीचे शिखर असेल तर त्याने हे मुक्तपणे खुलून सांगावं त्यात कसला कमीपणा?

'काळोखात ही ज्योतसम देते तुज ती सदैव साथ,अशक्य ही शक्य करण्या देत असे कायम हाती-हात'...

आज स्त्रियांच्या नैसर्गिक शक्तींना व गुणांना वाव मिळत असतो.पण अशा स्त्रियांची संख्या खूप कमी आहे. आजही तिचे कर्तृत्व तिला घरातले किती कामे येतात या वरून काही लोक ठरवतात.

तिच्या कर्तुत्वाकडे पाठ फिरवली जाते,
तिचा स्वाभिमान जपल्या जात नाही,
तिच्या कलेला ओळखले जात नाही,
तिच्या स्वतंत्र विचारांना वाट दिली जात नाही.

तिचा सन्मान तिची अब्रू लुटली जाते तेव्हा या समाजामध्ये बलात्कारासारख्या घृणास्पद घटना घडतात.तेव्हा तो नराधम पुरुष या जगात वावरण्याच्या वत्तीचा तरी आहे का? हा प्रश्न मी नेहमी करते आहे.पण,कोण ऐकेल? तिच्या वेदना,तिचे दुःख आज मी लिखाणातून मांडण्याचा एक छोटासा प्रयत्न करते आहे. अंत: करणातून दाटणारा हा आकांत शब्दात मांडते आहे.

आज साडे-तीनशे वर्षांपूर्वीच्या माझ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास मज आठवतो.माझ्या शिवाजी राजानी स्त्रीला समजून,तिची क्षमता समजून,तिची गुणवत्ता जाणून,तिला ओळखून जिजामाता ते घरच्या सूनेपर्यंत संसारातून ते राज्यकारभारापर्यंत स्त्रीला आपल्या राज्यकारभारात सामावून घेतलं.तिच्या संरक्षणाची भिंत होण्याकरिता शिवरायांचा वारसा आज स्मरणात व कृतीत आणण्याची नितांत गरज आज निर्माण झाली आहे.

स्त्री पुरुष जीवन रथाची सोबत फिरणारी दोन चाके आहे.पण,रथ नीट चालायला हवा तर चाके सारखी हवीत.एक मागे,एक पुढे चालणार नाही.दोन्हीही चाके कायम सोबत बरोबरीने हवीत.

'हृदयी स्पंदन असे स्त्री
जीवनास देई योग्य दिशा,
तिच्या निस्वार्थ सोबतीने
जगण्याची उमलते आशा'...

❖❖❖

# द्रौपदा हसींमउद्दीन शेख

■ **लेखिका : छाया कोरेगावकर**

'द्रौपदा हसींमउद्दीन शेख' - दोन भिन्न धर्मीय हे जोडनावं माझ्या डोक्यात खटका उडवून गेलं. म्हटलं हे रसायन काहीतरी वेगळंच दिसतंय. मलाही तिला भेटायची उत्सुकता लागून राहिली होती. वालिवलीच्या बौद्ध-वाड्यात आम्ही पोहचलो. गावठाण जमिनीवर वसलेला हा बौद्धवाडा आजूबाजूला एकमेकांना खेटून उभी असलेली बैठी घरे. अशाच एका बैठ्या घरात शिरलो. एका गोरटेल्या मध्यम वयाच्या बाईने आमचं तोंडभरून स्वागत केलं.

'या मॅडम, हे आमचं आपलं गरिबाचं घर !'. मी घरात नजर टाकली. दोन खोल्यांचं बऱ्यापैकी मोठं घर. बाहेरच्या खोलीत चांगला मोठा लाकडी बेड, प्लॅस्टिकच्या दोन खुर्च्या, कोपऱ्यात एक घरघंटी, काचेच्या शोकेसमध्ये हारीने नीटनेटक्या घड्या करून ठेवलेल्या रंगी-बेरंगी साड्या, आणि स्वयंपाकघरातून डोकावणारा फ्रिज ! म्हणजे घरात सगळ्याच सुविधा होत्या. 'मी म्हटलं, अगं गरिबाचं काय तुझं घर तर चांगलं सुसज्ज दिसतंय.' चांगलं श्रीमंत आहे की तुझं घर!

'आवो मॅडम, आख्खी जिंदगी हाडाची काड केली तवा हे हक्काचं घर उभं राह्यलंय !' नायतर जिंदगीभर गारुड्यावानी गावोगाव फिरून काढली.

म्हणजे तू मूळ मुंबईची नाहीस तर!

नाय आमचं गाव तिकडं नगर जिल्ल्यात, पिंपळखेड. पिंपळखेड्यात बापाचं घर आणि जमीन हुती. मला एक सावतर आई बी हुती. माज्या 'बा'ला दोन बाईक, पण माजी आय आंधळी. मी सातआठ वर्साची हुतो तवा बाप वारला. मला मोटा भाऊ व्हता पण त्याच अब्यासात बी ध्यान नाय अन् घरात बी! बाप मेल्यावर भाऊबंद शेतजमिनीसाठी भावकी कराय लागले. त्येनी आमाला तरास देयाला सुरवात केली. तवा मी आन ल्हान हुतो. पण आय आंधळी बाप न्हाई तव मीच खुरपं हातात घेतली. खुरप्याची मूठ बी माज्या हातात मावायची न्हाय तरी बी शेतात भांगलयला, खुरपायला जायचो. कधी कधी मराठ्याच्या गोठ्यात शेणाची घमेली उचलायचो.

भावानं आयला फसवून जमीन इकली. आमाला कसलाच आसरा ऱ्हायला नाय. मंग बारामतीला आम्ही पावण्यांकडे गेलो. तितं मी उसतोडीच्या कामावर जायची. घर नव्हतंच मंग जित जागा मिळंल तिथं कदी सालत, कदी माळरानावर असं आमी माय लेकी ऱ्हायचो. मंग गावातच वस्तीत एक झोपडं बांधलं. तिथं मा लेकी ऱ्हायला लागलो. पण भाऊ आदन-मदन यायचा आन माज्या कमाईचं पैसं घिऊन जायचा. तवा आयला सरकारी योजनेत ६० रु. पेन्शन मिळायची. मी १३-१४ वर्साची झाली तर आयला माज्या लग्नाचा घोर लागून ऱ्हायलेला. मग भाऊ इथं मुंबईला उल्हासनगरला आला. त्याने आमाला बोलवून घेतलं. तवा त्याची दुसरी बायको पोटुशी व्हती. तिचं बाळंतपण करायला आमी दोघी आलो. पण बायकोच बाळंतपण झाल्यावर भाईर काढलं. मंग चेंबूरला माजी मावशी व्हती. तिच्याकडं आलो आम्ही दोघी बी. मी तिथं चार घरची

धुणी-भांड्यांची कामं धरली. बरं चाललं व्हतं. पण घरात मावशीची मुलगी तिचा नवरा आणि तिची चार पोरं असा मोठा संसार !. त्येचं बी काय नाय वो, पण मावशीचा जावई, चार पोरांचा बाप माज्याशी लगीन करण्यासाठी मावशीकडं तगादा लावायला लागला.

'अगं पण त्याचं लग्न झालं होतं ना ?. त्याला तर चार मुलं होती. मग तुझ्या मागे का लागला ?

त्याचं म्हणणं ही बिनबापाची तरणी पोर म्हणजे जिवाला घोर ! भाऊ हाय त्यो बी बगत नाही. माझ्याशी लगीन केलं तर सुखानं दोन घास खाईल. पण मी शाप सांगितलं 'मांगा- भंग्याच्या' घरी जाईन पण भनीच्या संसाराचा असा इस्कोट करणार न्हाई '

'मांगा-भंग्याच्या घरी म्हणजे ?'

मी काहीच न समजून तिला विचारलं तर ती म्हणाली, हे बघा मॅडम, आमी बुद्धिष्ट. मांग- भंगी आमच्या खालचं. त्यांच्यात जाणं चांगलं मानत न्हाई आमच्यात ! पण भैनीचं वाटुळं करण्यापरीस खालच्या जातीत सोयरीक पत्करली. म्हणून तास म्हणाले.

ही जातीची उतरंड किती हाड-मासांत भिनलीय भारतीय समाजात! विपन्न अवस्थेत - जीवन मरणाच्या लढाईतसुद्धा जातीचा तिढा कसा ढिला होत नाही हेच द्रौपदीच्या व्यक्तव्यावरून अधोरेखित होत होतं. पुढे जाऊन द्रौपदीने हसींमउद्दीन शेख या मुस्लिमाशी लग्न केलं. तिला परक्या धर्माचा नाही पण जातीचा बाट अधिक विखारी वाटत होता. हे अनाकलनीय असलं तरी वास्तव होतं.

'बरं ! मग तुझं तिथे राहणं कठीण झालं, होय ना?

हा, मंग मावशीने लग्न करून दिलं. माजी आय आंधळी तिची जबाबदारी माज्यावर ! भाव बघायला तयार न्हाई. मग , मग मी अट घातली जो माज्या आईकडं बी बगल त्याच्याशीच लगीन करीन मी. मग अशी अट असल्यावर कुठचा चांगलं नवरा काबुल व्हईल ! मंग मिळाला तीन पोरांचा बाप. त्याची पईली तीन लग्न झाली होती. हा नवरा डोक्यानं येडपटच व्हता पण आईला सांभाळायला तयार झाला म्हणून घातलं डोरलं त्याच्या नावानं.

लगीन झाल्याच्या १५व्या दिवशी नवऱ्यानं फर्मान काढलं तिकडं तळोज्याला तलावाचं काम निगालंय. तिकडं जायचं आपल्याला. मंग चेंबूरवरन आमची वरात तळोज्यात आली. मंग तळोज्यात नवऱ्याबरोबर ट्रकवर माल भरायचं, दगडी वाहून न्यायची अशी मजुरीची कामं केली. तसं बरं चाललं व्हतं. पण नशिबाला कुटं बगवतंय ? आयला कॅन्सर झाला. मंग पुन्हा तिला घेऊन मावशीकडे चेंबूरला आले. आयसाठी माज्या हास्पिटलच्या फेऱ्या सुरू झाल्या. मावशीचा दारूचा धंदा ! ती दारू पिऊन तरात असायची ! आईच्या या दुखण्यात मला कोणाचीच मदत न्हाई. भाव बी बागना. मंग एकटीनंच आयला टाटा मधी अॅडमिट केलं. महिनाभर टाटा हास्पिटलमंदी आयसंग ऱ्हायले आन तिला बरी करून घरी आनली. तवा मला सातवा महिना लागला व्हता. 'दिवस गेले तेव्हा तू किती वर्षांची होतीस? आणि नवरा कुठे होता तुझा?

तवा मी १८-१९ वर्साची होती. आनि नवरा बी चेंबूरमधी झोपडं बांधून ऱ्हायला लागला. पण त्यानं मला बाळंतपणाला घरी नेलं नाही. म्हणाला बाळंतपण तुझ्या माहेरीच व्हायला पाहिजे.

मला पोरगी झाली मग गेले नवऱ्याकडे. तवा माझ्या सवतीची लेक आनि नवरा दोगच रहात व्हते. मी गेल्यावर नवरा म्हणाला तुज तू कमवून खा. तुला घरी बसून पुसायला मी रिकामा न्हाई. धट्टी-कट्टी व्हते तवा माज्या कष्टाचं खालं आन मला बसून खायचा टाईम आला तर नवऱ्यातला राकीस जागा झाला.

मग १२ दिवसाची पोरगी घेऊन मी वली बाळंतीण धुन-भांड्याच्या कामाला जायची. तिथंच कामवाल्यांकडं पोरीला ठिवायची. काई कामवाल्यानी दिलं-घेतलं तर खायची. नवरा मला पुसायला तयार नव्हता. तो म्हणत व्हता तुजं तू कमवून खा! मंग कामावरून जाताना २ रुपयाचं तांदूळ रुपयाची डाळ घेऊन जायची आनि माज मी येगळं करून खायची.

'म्हणजे नवऱ्याच्याच घरात तू वेगळी चूल मांडली म्हणायची !'

मंग काय करता? पदरात लहान लेकरू व्हतं. पण म्हणलं अशा नवऱ्याचा काय उपेग ? इथं राहून बी आपला आपुन येगळी चूल मांडून जगायचं तर आसला नवरा आसला काय आन नसला काय ? काय फरक पडतु ! मंग दोन म्हैन्याच्या पोरीला घेऊन मी इकडं बदलापूरला भावाकडे आली. तिथं मी बिगारी कामावर ऱ्हायले. तवा बिगारी कामाला १५ रु. हाजरी व्हती. पोरीकडं बघून मी घाम गाळत व्हते. पण भावजय घरात नीट राहू देईना. भाव कामाचे पैसं तर काढून घेयाचा पन बिल्डिंगीच्या कामावर असताना हयांच्यासंगट बोललीस, त्येंच्याकडं बगुन हासलीस आस म्हणून संशय घेया लागला. मार-झोड कराया लागला तवा मी जवान होते. दिसाया बी बरी व्हते. म्हणून भाव सारखा पाळतीवर असायचा. परत नवरा सोडून आलेली बाई म्हणजे बिना-दावणीची गाय ! येईल तो गायीचा मालक व्हायला बगायचा. बिल्डिंगच्या कामावर मुकादम होते. हसींमउद्दीन शेख. त्यांनी माजी परवड बघितली. मी बी त्यांना जिवाभावाचा समजून मन मोकळं करायची. एक दिवस शेख साहेब

घरी आले आणि भावाला म्हणाले तुम्हाला भैन जाड झाली आसन तर मी निका करतो. तिच्याशी मला तीन मुलगेच हायत. मला मुलगी पायजेल होती. तर तुमच्या भैनीची मुलगी हीच माजी मुलगी मानन मी ! आनि मंग शेख सायबांबरुबर माझा निका झाला.

पन शेख साहेबांची मुलं आनि बायको ?

त्याच्या बायकोने मंजुरी दिली व्हती. ती आनि पोरं त्यांच्या गावाला होती. पण आमचा निका झाल्यावर हळूहळू एका पोराला गावरून इकडं आणलं. त्येंची तीन आनि माजी एक असा चौघा पोरांचा सांबाळ केला. मला बी कुंकवाला धनी मिळाला. लोकांच्या वाईट नजरा कमी झाल्या.

आता तू कुंकवाचा धनी म्हणतेस पण मुस्लीम धर्मात तर कुंकू लावत नाहीत.

नाय नाय मला एकदम सोतंत्र हाय. ते मला म्हणतात तुला जसं राहायचं तसं रहा- कुंकू लाव डोरलं घाल. माझ्या सासरची माणसं बी आडवं लावत न्हाईत. मला खूप इज्जतीनं वागवत्यात. मला माज सन करायला बी मुभा हाय. मी दिवाळी करते, होळी करते आनि त्याची ईद बी करते. आमच्या घरात होळीला पुरणपोळी आनि ईदला शीरखुर्मा दोनी बी व्हतंय. तसला काय तरास न्हाई मला. निका केला तवा माज नाव सायराबानू ठिवल्यालं पण शेख सायेब म्हणले तुला द्रौपादा ठेवायचं तर ठेव मी आडवणार न्हाई. तर मी दुसऱ्या धर्मात लग्न करून बी माजा धर्म सोडला न्हाई. आमच्या घरात दोनी धर्मांची इज्जत व्हती.

'मंग मुलीचं काय ? तिच्या लग्नाला काही अडचण?'

आता आमच्या समाजात तरी काय सगळे बेवडेच. आता शेख सायबांचं नाव लावते तर त्यांच्याच धर्मात लावावं लगीन. मंग जावई बी मुसलमान हाये. पण जिवाला जीव देणारा इमानदार. सासू म्हणून माजी लय काळजी घेतो.

'मग घरकाम कधीपासून सुरू केलं?'

'पयल बी करत व्हते पण रहाण्याचा ठिकाना नाय तवा जित मोलमजुरी तितं करायची. पण इथे बदलापुरात आल्यापासनं बिगारीची कामं सोडली. आता २० वर्स झाली. धुन-भांडी करती'.

'मग बिगारीच्या कामात पैसे जास्त मिळतात की घरकामात?.

पैसं दोनीकडं बी मिळतात. पण बिगारी कामावर लोकांच्या वाईट नजरा असत्यात. इथं इज्जत मिळती. आब्रूवर कुणी ठपका ठिवत न्हाय. आन पैसं म्हणाल तर हे घर आमचं सोत्ताचं हाये. घरकामाच्या पैशावरच बांधलं. पोरांची शिक्षण केली. लेकीचं लगीन केलं. आता मी एकदम सुखात हाय. जावयांन बी शेजारीच घर बांधलंय. लेक बी जवळच ऱ्हायली. शेख सायेब बी चांगलं बघत्यात माज्या लेकीला तर सख्या लेकीपरीस लई जीव लावला त्यांनी.

'म्हणजे एकूण तुझ्या कष्टाला फळ आलं म्हणायचं !'

व्हय व्हय ! उगाच सुखाच्या दिसत कशाला रडायचं ? आता मी सुखातच हाय ! चार घरची धुनी-भांडी करती. ही घरघंटी बघितली का ? महिन्याला ७००-८०० रुपयांची कामे करून देती. आता कसलं दुख नाय !

'पण संघटनेशी कशी जोडली गेलीस?'

संघटनेचं नाव घेताच द्रौपदीचा चेहरा आनंदाने उजळून निघाला.

संघटनेचं काय सांगायचं मॅडम, आमचं म्हायेर हाये ते ! लय आधार वाटतो युनियनचा. त्यांनीच घर बांधायला कर्ज दिले. लॉकडाऊनच्या काळात आमाला उपाशी मरू दिलं नाही. आमची घरं किराण्याने भरून गेली होती. दुसरं म्हंजी युनियनमंदी आल्यापासून मी लय धीट झाले. पयले चार बायांच्यात बोलायला घाबरायची मी. पण आता भाषण बी दयायला शिकले. युनियनने लई ताकद दिली. युनियनची मीटिंग आमाला सना-सुदीसारखी वाटते. लय मजा करतो मीटिंगमधी. जिवा-भावाचं बोलतो, गाणी म्हणतो. जीव पार मोकळा करून घेतो.

शोकेसकडे बोट दाखवत द्रौपदी सांगत होती.

ह्या साड्या बघितल्या का? त्या मीटिंगसाठी ठिवल्यात. मीटिंगला आम्ही नटून सजून जातो.

द्रौपदीचे कष्ट सार्थकी लागले याचा आनंद होताच पण तरी एक प्रश्न मेंदूला कुरतडत राहिला. आपल्या समाजातला माणूस एकवेळ धर्माच्या पलीकडे जायला तयार आहे पण जातीच्या नाही. बौद्ध समाजाच्या म्हणजे पूर्वाश्रमीच्या महार द्रौपदीला मांग आणि भंगी शूद्र वाटतात. पण मुस्लीम जवळचे. ती याच घरात होळी दिवाळी दोन्ही करते. एकूणच समाजात एकवेळ धर्मांतर मान्य आहे पण जातीअंत नाही असंच एकूण चित्र दिसतं. तरीही एकाच घरात हिंदू - मुस्लीम दोन्ही धर्माचा सन्मान करणारं - दोन्ही धर्मातल्या कुटुंबीयांना सामावून घेणारं आणि एका अर्थाने राष्ट्रीय एकात्मतेचा साक्षात्कार घडविणारं 'द्रौपदी हसीमउद्दीन शेख' चं घर मला एखाद्या मंदिरापेक्षाही भव्य दिव्य आणि पवित्र वाटायला लागलं.

❖❖❖

# अन्नपूर्णा वार्तापत्र...

■ **अंजली दिवाण पाटील**

नमस्कार अन्नपूर्णा बंधू भगिनींनो...

ऑगस्ट चा संवाद अंक वाचला ना तुम्ही.. काही प्रतिक्रिया पाठवल्या का. तुमच्या प्रतिक्रिया मुळे लिहिणाऱ्या ना आनंद होतो, छान वाटते, तेव्हा नक्की प्रतिक्रिया पाठवत जा.

मागील तीन महिन्यांचा अन्नपूर्णा परिवाराचा अहवाल आता तुमच्यासमोर ठेवत आहे. सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर मध्ये खूप काही गोष्टी घडल्या आहेत.

त्यापूर्वी founder's day जो आपण १८ ऑगस्ट ला साजरा करतो, आणि कॉ. दादांच्या स्मृती प्रित्यर्थ पुस्तक प्रकाशन करतो, तो आपण २० ऑगस्ट ला साजरा केला. अर्थात प्रत्यक्ष करणे शक्य नसल्याने आपण झूम मार्फतच हा कार्यक्रम घेतला. यावेळी आपण **प्रा. आनंद मेणसे यांचे 'संघर्ष - महाराष्ट्रात विलीन होण्यासाठी'** हे पुस्तक पद्मश्री कुमार केतकर ह्यांच्या हस्ते प्रकाशित केले. शिवाय तीन पुस्तिका.. जागतिक , भारतीय आणि महाराष्ट्राचे अर्थकारण.. अश्या विषयांवर , दिग्गज लेखकांनी केलेले विश्लेषण. अशी पुस्तकं आणि आपला संवाद चा अंक प्रकाशित केला. प्रमुख पाहुणे होते कुमार केतकर. त्यांनी आपल्या भाषणात प्रा. आनंद मेणसे लिखित पुस्तकाचा छान परामर्श घेतला.

अत्यंत सुंदर असा हा फाउंडर्स डे कार्यक्रम नेहमीप्रमाणे शिस्तीने पार पडला.

मागील तीन महिन्यात फील्ड स्टाफ फिल्डवर जात आहेत. सर्व स्टाफचे कोविड लसीकरण पूर्ण करून घेतले आहे व फील्ड वर्क सुरू केले आहे.

Recovery covid पूर्वीच्या recovery पेक्षा साधारण ८०% आणि कर्ज तर फक्त ४०% अशी झाली आहेत. गटांची खूप मोडतोड झाली आहे. त्यामुळे रिझल्ट मिळणे अवघड जाते आहे. कोअर टीम मधे मेधा ताई आणि उज्वला ताई, आरती ताई ह्यावर खूप बारीक पणे काम करत आहेत. सॉफ्टवेअर टीम चीही मदत घेवून गट घट्ट कसे बांधले गेले पाहिजेत ह्यावर काम चालू आहे. एक मूठ, एक जूट हाच आपला पहिल्या पासून परवली चा नारा आहे. गट बांधणी वर आपण सर्वांनीच जास्त लक्ष दिले पाहिजे. आणि कर्ज कमी झाली तर आपल्या आरोग्य निधी, जीवन सुरक्षा निधी, कुटुंब सुरक्षा निधी व मालमत्ता हानी निधी साठी येणारा निधी वाढणार कसा?

शिवाय उत्पन्न कमी होऊन आपल्या AMCCSL, APVS ह्या दोन प्रमुख संस्थांना आर्थिक फटका बसणार!

त्यातही एक चांगली गोष्ट म्हणजे, सध्या कर्ज कमी होत आहेत त्यामुळे आपल्याला बाहेरच्या financial institutions कडून कर्ज घ्यावे लागले नाही. उलट आपण आपल्या कडील शिल्लक रहाणाऱ्या रकमे मधून ही कर्ज कमी केली.

Non borrowers social investors यांची fixed deposits, recurring deposits वाढवण्याचा आपला प्रयत्न चालू आहे, की ज्यायोगे २,३ वर्षात आपण स्वतः इतके सक्षम होवू की आपल्याला बाहेरील बँका किंवा financial institutions कडून कर्ज घ्यावे लागणार नाही.

तुम्हाला माहित आहेच, Covid पासून आपल्याकडे आजारपणाच्या क्लेम ची संख्या वाढली आहे. दरमहा ६००, ७०० क्लेम येत आहेत आणि प्रत्येकाला नक्कीच क्लेम मिळाला पाहिजे. मग आहे त्या फंडातून किती जणांना मदत देता येईल बरे. फंड तर संपत आला, पार खडखडाट झाला आहे. त्यामुळे साधारण १ मे पासून आपण असा निर्णय घेतला आहे की प्रत्येकाला काही % मदत नक्कीच मिळावी यासाठी HMF, LMF साठी काही पिंच लावली जाईल. आणि अजूनही claim येतच आहेत तर ती पींच आपण मार्च २२ पर्यंत तशीच ठेवत आहोत, किंवा अजून थोडी पिंचं वाढवावी ही लागू शकते , कारण क्लेम मदत प्रत्येकाला मिळालीच पाहिजे, फंड शिल्लक राहून त्यातून मदत देता आली पाहिजे. पटते आहे ना तुम्हाला?

एक विशेष उल्लेख Give India ह्या सामाजिक संस्थे कडून आपण यावेळी जवळ जवळ १०० कुटुंबामधे , LMF death claim साठी Rs. ३००००/- प्रत्येक कुटुंबाला मिळवून दिले आहेत. Covid मुळे घरातील कमावत्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर पूर्ण कुटुंब देशोधडीला लागू शकते. अश्या १०० कुटुंबांना Give India यांचे कडून मदत मिळाली आहे. त्यांची ही मदत ह्या कुटुंबांना पुढे जाण्यास नक्कीच उपयुक्त आहे.

तुम्हाला माहित आहेच, covid २० नंतर आपल्या पाळणाघर मधील मुलांची संख्या ४०० वरून अक्षरश: ० झाली होती. कोणीच पालक मुलांना ठेवू इच्छित नव्हते. त्यांना हाताला कामे पण नव्हतीच. परंतु covid पहिली , दुसरी लाट ह्यांच्या हिंदोळ्यात ही आज आपली १० पाळणाघरे , जवळ जवळ २५० मुलांसह चालू आहेत. आपण पाळणाघराचे fumigation करवून घेतले. मुलांच्या आरोग्याची सर्व काळजी घेतली आहे. त्यामुळे पालकांचा आपल्या पाळणाघर वरील विश्वास वाढताना दिसत आहे.

दरवर्षी आपल्या अन्नपूर्णा परिवार कडून विद्या पूर्णा अंतर्गत साधारण ९०० ,ते १००० मुलांना शैक्षणिक शिष्यवृत्ती दिली जाते. अश्या कठीण परिस्थिती मध्येही यावर्षी ११०० मुलांना साधारण २८.५० लाखाची आपण शैक्षणिक शिष्यवृत्ती दिली आहे. ती रक्कम एकल मातांच्या बँक अकाऊंटला डायरेक्ट ट्रान्स्फर केली गेली आहे.

नेहमी प्रमाणे CR मीटिंग , community representative meetings झूम नेच झाल्या आहेत. क्लेम संदर्भातील निर्णय सर्वानुमते घेतले आहेत. परिस्थिती चांगली राहिली तर साधारण जानेवारी २२ पासून आपण प्रत्यक्ष ह्या मीटिंग घेवू शकू असे वाटते.

आपल्या सर्वांच्या आनंदाची गोष्ट म्हणजे अन्नपूर्णा परिवारला **'पुण्यभूषण पुरस्कार'** जाहीर झाला. हा पुण्यातील अतिशय मानाचा पुरस्कार आहे.

पुण्य भूषण फाऊंडेशन व सकाळ सोशल फाऊंडेशन ह्यांच्या कडून **'पुण्य भूषण पक्के पुणेकर : कृतज्ञता पुरस्कार' हा पुरस्कार मेधाताईंनी कृतज्ञता पूर्वक स्वीकारला. ४ नोव्हेंबर रोजी दिवाळी पहाट निमित्त राहुल देशपांडे चे गायन ही होते.**

अन्नपूर्णा परिवार तील सर्वांना ह्याबद्दल खूप खूप आनंद वाटतो आहे.

आणि अजून एक गोष्ट म्हणजे फेमिना सारख्या प्रसिद्ध मासिकच्या दिवाळी अंकात अन्नपूर्णा परिवार बद्दल 'Big Story' आली. फोटो ही छापून आला आहे. ही सुद्धा आपल्या सर्वांच्या साठी आनंदाची गोष्ट आहे.

अशा प्रकारे गेल्या तीन महिन्यांमधील अन्नपूर्णा परिवाराची वाटचालीचा आढावा थोडक्यात घेतला आहे.

❖❖❖



**सुकन्या मोने यांच्याकडून दैनिक लोकसत्ता तर्फे देण्यात आलेला 'दुर्गा' पुरस्कार स्वीकारतांना अन्नपूर्णा परिवाराच्या विश्वस्त वृषाली ताई**

अन्नपूर्णा परिवाराच्या विश्वस्त वृषाली मगदूम यांना दैनिक लोकसत्ता तर्फे त्याची स्त्री मुक्ती संघटनेतील सक्रीय भागिदारी, महिलाच्या सबली करणासाठी अन्नपूर्णा परिवारातर्फे करत असलेले काम तसेच स्त्रियांचे समुदपदेशन, मार्गदर्शन, वृत्तपत्रात लेखन, यासाठी ''**दुर्गा**'' पुरस्कार २८ ऑक्टोबर २०२१ रोजी देऊन सन्मानित करण्यात आले. वृषाली ताईचे अन्नपूर्णा परिवारातर्फे हार्दिक उभिनंदन.


दिवाळी पहाट














अन्नपूर्णा परिवारातर्फे श्री सुरेश थोपेश्वरकर यांनी ''संवाद त्रैमासिक'' न्यू एज प्रिंटींग प्रेस,
८५ सयानी रोड, प्रभादेवी ४०००२५ येथे छापून घेतले.